वर्ष ४६
अंक ६

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

जून २०२६
अधिक ज्येष्ठ / निज ज्येष्ठ
शके १९४८

जून महिना उजाडला आहे. उत्तर अमेरिकेत शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या आहेत, तर भारतात उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपून नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागली आहे. लहानपणी कोकणातील सुट्टी संपवून परतताना पुन्हा एकदा आजोळी जावेसे वाटत असे. ७ जून - मृग नक्षत्र - "नेमेची येतो मग पावसाळा" या उक्तीप्रमाणे पावसाचे आगमन, नवीन दप्तर आणि रेनकोट खरेदी, तसेच शाळेची तयारी — जून महिन्याच्या या सगळ्या आठवणी मनात आजही ताज्या आहेत.

गेल्या महिन्याच्या सुरुवातीला बॉस्टन येथे न्यू इंग्लंड मराठी मंडळाच्या "महाराष्ट्र दिनाच्या" कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला. डॅलस आणि बॉस्टनच्या कलाकारांनी "देवगिरी ते रायगड" हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित भव्य महानाट्य सादर केले. या कार्यक्रमासाठी भारतातून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार मिलिंद देवरा, तसेच केनियातील एक खासदार उपस्थित होते.



गेल्या महिन्यात डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या दुःखद निधनाची बातमी समजली आणि आपण सर्वजण एका प्रतिभावंत, संवेदनशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्वाला मुकलो. यावर्षीच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी आम्ही त्यांना निमंत्रित केले होते, तसेच अधिवेशनापूर्वी काही शहरांमध्ये त्यांच्या व्याख्यानांचे ही आयोजनही केले होते. दुर्दैवाने आता हे सर्व अपूर्णच राहिले. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे डॉ. आनंद नाडकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

जागतिक घडामोडींचे परिणाम आता सर्वदूर जाणवू लागले आहेत. वाढती महागाई आणि जागतिक मंदीचा परिणाम अनेकांच्या नोकऱ्यांवरही होताना दिसत आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनालाही याचा काही प्रमाणात फटका बसला आहे. तरी उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी बांधवांना माझी नम्र विनंती आहे की त्यांनी अधिवेशनाला उपस्थित राहून आम्हाला सहकार्य करावे. तसेच संभाव्य प्रायोजकांची माहिती असल्यास ती आम्हाला जरूर कळवावी.

गेल्या महिन्यात आम्ही काही नवीन उपक्रम जाहीर केले. त्यातील एक महत्त्वाची घोषणा म्हणजे BMM आणि BVG यांच्यात झालेला सहकार्य करार. या उपक्रमाअंतर्गत, भारतात प्रवास करणाऱ्या उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवांना विमानतळावर आगमन झाल्यापासून विविध प्रकारची मदत उपलब्ध होऊ शकते. धार्मिक किंवा पर्यटन सहली, मेडिकल टुरिझम, वृद्ध आई-वडिलांच्या देखभालीसाठी आवश्यक सेवा, जागेचे व्यवहार, बँक आणि सरकारी कामांसंदर्भातील मदत अशा विविध सुविधा या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत युवा पिढीला एकत्र घेऊन विधायक कार्य करता यावे, यासाठी स्थानिक मंडळांच्या सहकार्याने प्रत्येक मंडळाला $१५० पर्यंत 'मॅचिंग फंड' देण्याचा निर्णय आमच्या समितीने घेतला आहे. सर्व मंडळ अध्यक्षांना माझी विनंती आहे की त्यांनी युवांसाठी एखादा उपक्रम आयोजित करावा, ज्यातून त्यांना नेतृत्व, संघटन कौशल्य आणि सामाजिक सहभाग यांची संधी मिळेल. आजचे युवा हेच उद्याचे स्थानिक मंडळे आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्यकर्ते आणि नेते आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधी देणे हे आपले कर्तव्य आहे.

मागील वर्षाप्रमाणे यंदाही आम्ही Summer Mentorship वर्ग आयोजित केले आहेत. विद्यार्थ्यांना नव्या विषयांची ओळख करून देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर "Summer Volunteering in India" आणि "Medical Internship in India" हे उपक्रमही उपलब्ध आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाने Avant संस्थेबरोबर केलेल्या सहकार्यामुळे आता उत्तर अमेरिकेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेसाठी "Foreign Language Credits" तसेच "Global Seal of Biliteracy" मिळवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पुढील महिन्यात आषाढी एकादशी आहे. गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही आम्ही "परदेशातील वारी पंढरीची" हा उपक्रम जाहीर केला आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या निवडणुकाही जाहीर झाल्या आहेत. विविध पदांसाठी एकूण १८ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत आणि प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. सर्व उमेदवारांना मनःपूर्वक शुभेच्छा! या सर्व उपक्रमांविषयी अधिक माहितीसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाला अवश्य भेट द्या.

उत्तर अमेरिकेतील मराठी शाळांच्या मदतीने ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी "समाजरंग" तर्फे एक सामाजिक उपक्रम करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. त्याला सर्व मराठी शाळांकडून चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

लेखाची सांगता करण्यापूर्वी, येणाऱ्या Father's Day निमित्त सर्व वडिलांना हार्दिक शुभेच्छा! तसेच वटपौर्णिमेच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा! जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| Mandal Yuwa Summer Program | ७ |
| राशिभविष्य | ७ |
| श्रद्धांजली | ८ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | ९ |
| BMM Uttarrang Senior Living Communities Database | १० |
| जाहिरात | ११ |
| जाहिरात | १२ |
| जाहिरात | १३ |
| परदेशातील वारी पंढरीची | १४ |
| कविता: पितृ दिन | १४ |
| आनंदाचे देणे | १५ |
| स्वर संजीवनी | १६ |
| दिवाळी अंक आवाहन २०२६ | १८ |
| अजरामर | १९ |
| ती आणि तिचे गॅरेज | २० |
| कविता: जीवनगाणे..! | २२ |
| पडत्या दुर्बीणीला स्थिरावताना | २२ |
| कविता: वसंतरंग | २४ |
| मराठीपणाचा जागतिक उत्सव : BMM अनुभवताना. | २५ |
| जाहिरात | २६-३४ |
| MANA Paintings | ३५ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

***मे महिन्यातील स्वयंसेवक सभा***



‘बीएमएम वृत्त’च्या सर्व वाचकांना नमस्कार! जून मध्ये येणाऱ्या पितृदिनाच्या बीएमएम मधील पित्याची भूमिका निभावणाऱ्या आणि पितृतुल्य सदस्यांना हार्दिक शुभेच्छा!!!

अधिक महिना सुरू झाला आहे. भारतीय संस्कृतीत हा महिना श्रद्धा, चिंतन, कुटुंबीयांसोबतचे नाते आणि नव्या संकल्पांचा काळ मानला जातो. या शुभ पर्वाच्या निमित्तानेही सर्वांना हार्दिक शुभेच्छा. अधिक महिन्याच्या या मंगल वातावरणात बीएमएम२०२६ च्या तयारीलाही नवा उत्साह लाभला आहे, आणि प्रत्येक दिवसागणिक आपल्या भेटीची आतुरता वाढत आहे. उत्साह, आपुलकी आणि नव्या उर्जेच्या वातावरणात बीएमएम२०२६ ची तयारी आता अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. १ जूनपासून ६ ऑगस्टपर्यंत आता फक्त एकूण ६६ दिवस उरले आहेत.

🎟️ **तिकीटविक्रीबाबत महत्त्वाची माहिती:** ३ जुलै नंतर तिकीट विक्रीचा ३रा टप्पा सुरु होईलआणि या टप्प्यातील तिकिटाचे दर लागू होतील. पुढील वाढ होण्यापूर्वी लवकरात लवकर नोंदणी करा.

तिसरा टप्पा - अमेरिका स्वातंत्र्यदिन, ४ जुलै ते अधिवेशन शुभारंभ ६ ऑगस्ट - $७००

**संकेतस्थळाबद्दल अद्ययावत माहिती:** बीएमएम२०२६ ची अधिकृत वेबसाइट आता सुधारित स्वरूपात उपलब्ध आहे. या नवीन आवृत्तीमुळे सर्व माहिती अधिक सुलभ, स्पष्ट आणि आकर्षक पद्धतीने उपलब्ध झाली आहे.

🤝 **सामाजिक उपक्रम:** ‘शिका आणि कमवा’ (Learn and Earn) या तत्त्वावर कार्य करणाऱ्या पुण्यातील विद्यार्थी सहाय्यक समिती (VSS) या संस्थेला वेबसाइटसंबंधित काम देण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव, कौशल्य विकास आणि आर्थिक संधी मिळाली. त्यामुळे बीएमएम केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून समाजातील तरुणांना सक्षम करणारे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यासपीठ आहे, हे अधोरेखित होते. या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने काम करून बीएमएम च्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. VSS टीमचे मनःपूर्वक कौतुक आणि आभार.

**काही कार्यक्रमांची माहिती:**

- अनेक वर्षांपासून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे 'ऑल द बेस्ट' नाटक आता बीएमएम२०२६ मध्ये अनुभवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे! हे नाटक मराठी रंगभूमीवर अजरामर ठरलेल्या सर्वात लोकप्रिय विनोदी नाटकांपैकी एक आहे. हास्य, मनोरंजन आणि अप्रतिम अभिनयाची मेजवानी असलेले हे नाटक आता प्रथमच उत्तर अमेरिकेत येत आहे. नाट्यप्रेमींसाठी ही एक खास पर्वणी ठरणार आहे.
- सिॲटलचे नाट्य-प्रेमी कलाकार संगीत शारदा हे संगीत नाटक तुमच्या मनोरंजनसाठी अधिवेशनात घेऊन येत आहेत..संगीत शारदा हे नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांनी लिहिलेले आणि दिग्दर्शित केलेले १८९९ मधील मराठी संगीत नाटक आहे. भारतातील नाट्य साहित्य, मुख्यत्वे ऐतिहासिक-पौराणिक कथनांवर केंद्रित असताना, सामाजिक समस्या दाखवणारे आणि बालविवाहाचा विषय हाताळणारे व नेहमिचे नियम मोडणारे हे मराठीतील पहिले नाटक मानले जाते. हे नाटक भारतातील सामाजिक नाटकातील अग्रगण्य मानले जाते. ह्या नाटकाने लोकप्रियता अशा प्रकारे मिळवली की जेव्हा हरीविलास सारडा यांनी प्रस्तावित केलेला बालविवाह प्रतिबंध कायदा, (१९२९ मध्ये कायदा संमत झाला) ज्याला "सारडा कायदा" देखील म्हणत असे, त्याचेच अपभ्रंशाने '‘शारदा कायदा’' असे नावही पडले.
- या नाटकात कलाकारांचा मोठा संच आहे (एकूण १६ कलाकार). यामध्ये लाईव्ह गायन आणि तबला/पेटीची साथसंगत आहे. शिवाय संगीत नाटक असले तरी ते विनोदी नाटक आहे
- शिवाय १२५ वर्षे जुन्या मराठी भाषेत सादर होत असलेले हे नाटक मराठी ही अभिजात भाषा का आहे यामागील एक महत्त्वाचे कारण अधोरेखित करते.

🎤 **स्वरमंच गायन स्पर्धेला इंस्टाग्रामवर उत्स्फूर्त प्रतिसाद!:**
एकल असो वा समूह सादरीकरण, असंख्य स्पर्धकांनी अप्रतिम व्हिडिओज पाठवून स्पर्धेची रंगत वाढवली आहे. त्यामुळे अंतिम फेरीसाठी निवड करणे परीक्षकांसाठी खरोखरच आव्हानात्मक ठरणार आहे! या स्पर्धेचे परीक्षक आहेत सुप्रसिद्ध गायक, संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी. लवकरच अंतिम फेरीतील स्पर्धकांची घोषणा होणार असून, एका सुरेल मेजवानीसाठी तयार रहा! ✨🎤 २५ हून अधिक स्पर्धकांबरोबर हा अंतिम सोहळा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रमुख रंगमंचावर रंगणार आहे ज्याला सर्वांचा लाडका झी सारेगमप चा वाद्यवृंद साथ करेल.

**वेशभूषा (Dress Code):** आदरातिथ्य समितीने अधिवेशानासाठी वेशभूषा सुचवली आहे.

**दिनांक: ऑगस्ट ६ - Day Zero**

**वेशभूषा संकल्पना:** तिरंगा - भारताच्या ध्वजाच्या रंगांमधून आपल्या भारत देशाबद्दलची भावना साजरी करा.
**रंग:** केशरी / भगवा, पांढरा , हिरवा, निळा
**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**
**महिला:** सिल्क साडी, पारंपरिक वेशभूषा, तिरंगा रंगांतील इंडो - एथनिक फ्युजन वेअर
**पुरुष:** सलवार कुर्ता, जोधपुरी, कोणताही भारतीय पोशाख, सूट / ब्लेझर
**स्टाईल:** ध्वजातील ४ रंगांची सरमिसळ स्वीकार्य आहे. (मिक्स अँड मॅच!)

**दिनांक: ऑगस्ट ६ संध्याकाळी - Banquet**

**वेशभूषा संकल्पना: थाट विदेशी, बाणा मराठी**
**इंडो-वेस्टर्न** - भारतीय पेहरावातील सौंदर्य आणि पाश्चात्य ग्लॅमर यांचा सुंदर संगम
**रंग:** वाइन / बर्गंडी, पाचू हिरवा, शॅम्पेन किंवा रोझ गोल्ड, तांबडा (कॉपर), गडद मरून किंवा लाल, आयव्हरी, बेज
**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**
**महिला:** वेस्टर्न गाऊन, सिक्विन साडी, इंडो-वेस्टर्न फ्युजन ड्रेस
**पुरुष:** जीन्ससोबत ब्लेझर, सेमी-फॉर्मल पोशाख, इंडो-वेस्टर्न जॅकेट्स
**स्टाईल:** एलिगंट, मॉडर्न, ग्लॅमरस

**दिनांक: ऑगस्ट ७ दिवसा**

**वेशभूषा संकल्पना:** पेशवाई थाट - पैठणी, पारंपरिक राजेशाही नऊवारी, धोतर
**रंग:** काठपदर साड्यांचे असतात तसे उठून दिसणारे कोणतेही रंग
**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**
**महिला:** पैठणी – साडी, परकर-पोलका / ड्रेस, कुर्ती
- नऊवारी साडी, शेला
- पारंपरिक दागिने - ठुशी, कोल्हापुरी साज, तन्मणी, चिंचपेटी, मोहनमाळ, नथ, वाकी, तोडे इ.

**पुरुष:** धोतर-कुर्ता / सदरा, पैठणी जॅकेट / भरजरी उपरणे, ॲक्सेसरीज: फेटा / टोपी / पगडी, कोल्हापुरी चप्पल, मोजडी

**स्टाईल:** जोडीने एकसारखा पोशाख घालण्यास प्रोत्साहन आहे (twinning)

**दिनांक: ऑगस्ट ७ संध्याकाळी**

**वेशभूषा संकल्पना:** लख लख चंदेरी सोनेरी

**रंग:** चमकदार/ग्लिटरी काळा, सोनेरी, रुपेरी

**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**

**महिला:** वरील कोणत्याही रंगात साडी, लेहेंगा, ड्रेस

**पुरुष:** वरील कोणत्याही रंगात सलवार कुर्ता, कॅज्युअल पोशाख

**स्टाईल:** चमकदार (sparkling), आकर्षक, पार्टी

**दिनांक: ऑगस्ट ८ दिवसा**

**वेशभूषा संकल्पना:** महाराष्ट्राची वस्त्रपरंपरा - महाराष्ट्राच्या पारंपरिक वस्त्रोद्योगातील सौंदर्याचे सादरीकरण

**रंग:** तुमचा आवडता रंग

**महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण विणकाम:** खण, नारायण पेठ, इल्कल, करवटी किनार

**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**

**महिला:** साडी, परकर-पोलका, लांब ड्रेस

**पुरुष:** कुर्ता-पायजामा/ सलवार, मराठी पारंपरिक पोशाख, खण टोपी

**स्टाईल:** वारसा, हातमाग, अस्सल

**दिनांक: ऑगस्ट ८ संध्याकाळी**

**वेशभूषा संकल्पना:** भारतीय वस्त्रकला- भारतातील समृद्ध कलात्मक परंपरा, विविध वस्त्रशैली आणि हस्तकलेचा उत्सव

**रंग:** तुमचा आवडता रंग: भारतातील विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण विणकला, हस्तकाम, भरतकाम - **प्रेरणा:** अजरख, बांधणी, कलमकारी, मधुबनी, वारली कला, कांथा, पट्टचित्र, चिकनकारी, फुलकारी, काशिदा, कसुती, बागरू, लहरिया, कच्छ/मिरर वर्क, जरदोसी इ.

**कपड्यांसाठी पर्याय /सुचवणी:**

**महिला:** सिल्क साड्या, पारंपरिक ड्रेस, साडी नेसण्याच्या विविध शैली, विविध भारतीय राज्यांशी सुसंगत दागिने – ऑक्सिडाईज्ड, टेंपल ज्वेलरी इ.

**पुरुष:** भारतीय हातमागावरील कपड्यांचे पोशाख सलवार कुर्ता/ वेष्टी,

**स्टाईल:** कलात्मक, रंगीबेरंगी, सांस्कृतिक

**दिनांक: ऑगस्ट ९ दिवसा**

**वेशभूषा संकल्पना:** रंग ढंग : BMM2026 च्या अंतिम दिवसाचा उत्सव पेस्टल रंगछटांतील आकर्षक पारंपरिक वेशभूषा आणि सहजसुंदर स्टाईलसह साजरा करा. या अविस्मरणीय प्रवासाची सांगता करताना आराम, रंग, संस्कृती आणि उत्सव यांचा सुंदर संगम अनुभवूया.

**स्टाईल:** आरामदायी, आकर्षक, हलकाफुलका, उत्सवी

**रंग:** थंड रंगछटा - पेस्टल शेड्स; ब्लश पिंक, पीच, पिस्ता हिरवा, लॅव्हेंडर, फिकट निळा, मिंट, सौम्य पिवळा

**महिला:** साडी, लेहेंगा, इंडो-वेस्टर्न ड्रेस, पलाझो, पंजाबी ड्रेस, कफ्तान

**कापड:** लिनेन, कॉटन सिल्क, शिफॉन, ऑर्गेन्झा, मल कॉटन

**पुरुष:** • कुर्ता सेट्स (लिनेन कुर्ता), • कॅज्युअल एथनिक वेअर, • कॅज्युअल एथनिक जॅकेट्स / पेस्टल नेहरू जॅकेट्स

## Day Zero - बीएमएम उपक्रम




**उत्तररंग** - ह्या उपक्रमाअंतर्गत अधिवेशनातील दिवस Zero चे कार्यक्रम खास ५५+ वयोगटातील ज्येष्ठांसाठी नियोजित करण्यात आले असून तयारी जोरात सुरू आहे! या वयोगटाच्या गरजा, आवडी आणि जीवनशैली लक्षात घेऊन आम्ही माहितीपूर्ण, उपयुक्त आणि मनमुराद आनंद देणारे कार्यक्रम आखले आहेत. खालील कार्यक्रम निश्चित झाले आहेत:

* **मस्त बिनधास्त चोवीस तास** – डॉ. संजय उपाध्ये यांचे खुमासदार गप्पाष्टक


* **सुदृढ मेंदू, सक्षम वार्धक्य** – सिएटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांकडून मेंदूचे आरोग्य व निरोगी वार्धक्यावर मार्गदर्शन

* **मराठी अंताक्षरी स्पर्धा** – बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी!

* **सुवर्ण वयातील प्रवास:** पर्याय आणि नियोजन – कविता नंदी (Veena World) यांचे मार्गदर्शन

ज्ञान, अनुभव, मनोरंजन आणि प्रेरणा यांचा सुंदर संगम असलेले हे सत्र ज्येष्ठांसाठी खास तयार केले आहे. आपण सर्वांनी

मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमांचा लाभ घ्यावा, ही मनापासून विनंती!




**रेशिमगाठी: अनुरूप वर आणि वधू यांची आणि त्यांच्या पालकांची थेट भेट.**

या भेटीद्वारे दोन्ही कुटुंबांना एकमेकांना प्रत्यक्ष भेटण्याची, संवाद साधण्याची आणि परस्पर समज वाढवण्याची संधी मिळेल.
परंपरा, मूल्ये आणि अपेक्षा यांचा आदर राखत योग्य जुळवाजुळव घडवून आणण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या माध्यमातून योग्य जीवनसाथी निवडीची प्रक्रिया अधिक सुलभ, अर्थपूर्ण आणि सन्मानपूर्वक करण्याचा उद्देश आहे.

**बालतरंग आणि किशोरकुंज**




शाळकरी मुलांसाठी संस्कृती, सर्जनशीलता आणि उत्सव यांचा एक दिवस! कार्यक्रमांची झलक: स्वरसंवादिनी, महाराष्ट्राची लोकधारा, भाज्यांच्या राज्यात, स्त्रीशक्तीचा उत्सव, होलिका दहन, शब्दांची वारी, समन्वय, एम ड्रामा, तंजावर डान्स स्कूल




**Recess मैत्रीची मधली सुट्टी कार्यक्रम**

**सादरकर्ते:** सुप्रसिद्ध गायक आणि संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी

बीएमएम२०२६ मध्ये युवांसाठी तीन दिवस भरपूर मजा, नेटवर्किंग आणि अविस्मरणीय अनुभव देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत!

**गुरुवार: स्वागत समारंभ / हॅपी अवर**

**शुक्रवार:** ओळख वाढवणारे उपक्रम (Ice Breakers), स्पीड डेटिंग, क्रूझ **कॅण्डललाइट कॉन्सर्ट -** शुभंकर कुलकर्णी

**शनिवार:** नृत्य कार्यशाळा, तंत्रज्ञान संवाद (Tech Talk), आणखी एक कार्यशाळा / चर्चासत्र

शनिवारच्या मुख्य कार्यक्रमानंतर आर्केड / बार भेट

आम्हाला आपल्या मदतीची नितांत गरज आहे —
देणगीदार म्हणून योगदान द्या, तिकीट खरेदी करा किंवा स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हा. आपण सर्व मिळून हे अधिवेशन भव्य, यशस्वी आणि अविस्मरणीय बनवू आमचा हा दृढ विश्वास आहे.
या संस्कृतीच्या महोत्सवात आपला मोलाचा सहभाग नक्की नोंदवा.
देणगी साठी संपर्क : donations@bmmseattle2026.org

हापूस आंब्यांचा सीझन सुरू झालेला आहे! अमेरिकेतही तुम्हा सगळ्यांना त्या हापूसचा गोडवा नक्कीच चाखायला मिळाला असेल. आणि जसा हा आंब्याचा गोडवा आपल्याला नॉस्टॅल्जिक करून जातो तसंच बीएमएम२०२६ अधिवेशनही आपल्या संस्कृतीचा, नात्यांचा आणि त्या खास मराठमोळ्या भावनेचा अनुभव जिवंत करणार आहे.😉🥭

आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. भेटूया सिॲटलमध्ये... #Seaya तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇🏼

**संकेतस्थळ:** https://bmmseattle2026.org

**यूट्यूब:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE

**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle


फेसबुक ग्रुप: www.facebook.com/groups/bmm2026seattle

**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle

**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ - हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे. चला, जपूया संस्कृती, विणूया नाती !!! 🙏🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम २०२६ समिती)




## Mandal Yuwa Summer Program

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे “Mandal Yuwa Summer Program” हा नवीन उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा उद्देश - उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये आपल्या युवांमध्ये नेतृत्वगुण, एकत्रित काम करणे, निर्णयक्षमता आणि समाजाशी जोड निर्माण करणे हा आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रत्येक मंडळाला युवा उपक्रमांसाठी matching support (up to $150) देणार आहे.

कृपया आपल्या मंडळातील युवांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करा.

या उपक्रमासाठी असंख्य संधी उपलब्ध आहेत. खाली काही उदाहरणे दिली आहेत:

- समाजोपयोगी प्रकल्प (उदा. स्थानिक उद्यानात बाक बसवणे किंवा इतर सार्वजनिक सुविधा उभारणे)
- Team-building, सहल (picnic) आणि मैदानी उपक्रम
- संगीत, नृत्य, नाटक किंवा कलागुण सादरीकरण कार्यक्रम
- Indoor/Outdoor क्रीडा स्पर्धा
- स्वयंसेवा आणि निधी संकलन उपक्रम
- नेतृत्व विकास कार्यशाळा (Leadership workshop) किंवा युवा networking कार्यक्रम
- Teamwork, नेतृत्वगुण आणि सामाजिक सहभाग वाढवणारे कोणतेही उपक्रम, ज्यामध्ये युवा काही तास अर्थपूर्णरीत्या सहभागी राहतील

कृपया लक्षात ठेवा की आजचे हे युवा, उद्याचे 'तुमच्या मंडळाचे आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे' नेते असतील – त्यामुळे त्यांना बरोबर घेऊनच यापुढील सामाजिक कार्ये करूया.

- **प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

**राशिभविष्य : जून २०२६**

**“२ जून पासून गुरुचे शुक्रा बरोबर कर्क राशीतले भ्रमण जीवन सुखमय बनवेल.”**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## श्रद्धांजली

**बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रसिद्ध मनोविकासतज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**



मन, माणूस आणि समाज यांचा अतिशय संवेदनशीलतेने विचार करणारा एक सच्चा विचारवंत आज आपल्यात नाही, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. मानसिक आरोग्यासारख्या (Mental Health) अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या विषयाला त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे अतुलनीय कार्य केले. असंख्य कुटुंबांना, तरुणांना आणि रुग्णांना त्यांनी आधार, दिशा आणि जगण्याची नवी उमेद दिली.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सिॲटल अधिवेशनासाठी आम्ही त्यांना निमंत्रित केले होते. त्यांच्या अमेरिका दौऱ्याचे नियोजनही जाहीर झाले होते आणि त्यांच्या विमानप्रवासाची तयारीदेखील पूर्ण झाली होती.

https://bmmonline.org/samajrang/drnadkarni/

या दौऱ्याचे संपूर्ण नियोजन आपल्या मिनेसोटा मंडळाच्या बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधी सौ. सायली अमरापूरकर करत होत्या. या कार्यात मदत करणाऱ्या सर्व मंडळ अध्यक्षांचे, मंडळ प्रतिनिधींचे आणि स्वयंसेवकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

डॉ. नाडकर्णी यांचे कार्य केवळ वैद्यकीय क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते; त्यांनी मानसिक आरोग्याबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्याचे मोठे सामाजिक कार्य उभे केले. त्यामुळेच मी सर्व मंडळांच्या अध्यक्षांना नम्र आवाहन करतो की, यावर्षी आपल्या मंडळात Mental Health या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर किमान एक तरी कार्यक्रम, परिसंवाद किंवा संवाद सत्र आयोजित करावे. हीच त्यांना आपण वाहू शकणारी खरी आदरांजली ठरेल.

डॉ. नाडकर्णी यांच्या Institute for Psychological Health (IPH) या संस्थेविषयी अधिक माहिती:

https://www.healthymind.org/index.php

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

**- प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ



आज आपण अत्यंत दुःखद भावनेने आपल्या आदरणीय मार्गदर्शक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी एकत्र आलो आहोत.

ते केवळ मनोविकारतज्ञ नव्हते, तर एक संवेदनशील श्रोते, विचारवंत, कवी आणि समाजाला नवी दिशा देणारे दूरदर्शी व्यक्तिमत्त्व होते. जिथे समाजाने कलंक आणि दुर्लक्ष पाहिले, तिथे त्यांनी मानवी वेदना ओळखल्या आणि त्यांना समजून घेऊन करुणेने प्रतिसाद दिला.

इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ (IPH) च्या माध्यमातून त्यांनी केवळ उपचारसेवा दिली नाही, तर मानसिक आरोग्याबाबत एक व्यापक सामाजिक चळवळ उभी केली. असंख्य व्यक्तींच्या जीवनात त्यांनी आशा, आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण केले.

त्यांचा जिज्ञासू, निरागस आणि सदैव हसतमुख स्वभाव, तसेच माणुसकीच्या मूल्यांवर असलेला त्यांचा दृढ विश्वास हे आपण सर्वांनी पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

डॉ. आनंद नाडकर्णी - जन्माने दत्तात्रय, पण आपल्या कार्याने आणि देणगीने खरंच 'आनंद' ठरले.

त्यांचे शारीरिक अस्तित्व आता आपल्या सोबत नाही, परंतु त्यांनी दिलेला 'आनंद' आणि प्रेरणा आपल्या प्रत्येकाच्या जीवनात सदैव जिवंत राहील.

जसे एका सुंदर वचनात म्हणतात —

"दुःख करू नका की ते आता नाहीत;
कृतज्ञतेने जगा की ते आपल्या आयुष्यात होते."

त्यांच्या आयुष्यात त्यांनी समर्पित, तज्ञ आणि करुणामय सहकाऱ्यांची एक सक्षम टीम घडवली आहे, जी त्यांच्या कार्याचा दीप पुढे नेईल आणि समाजाच्या विविध घटकांपर्यंत त्याचा लाभ पोहोचवत राहील.

आज, त्यांच्या स्मृतीपुढे नतमस्तक होत, मीही वैयक्तिकरीत्या हा संकल्प व्यक्त करते/करतो की, त्यांच्या विचारांचे, कार्यपद्धतीचे आणि माणुसकीपूर्ण दृष्टिकोनाचे वारसत्व पुढे नेण्याचा मी मनापासून प्रयत्न करीन.

चला, त्यांच्या पवित्र स्मृतींना आदरांजली अर्पण करण्यासाठी आपण काही क्षण शांततेत स्मरण करूया.

- **सायली अमरापूरकर,** मिनियापोलिस, मिनेसोटा

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



**मिहीर आपटे,** कलासंपन्न घरात लहानाचा मोठा झाला. त्यामुळे लहानपणापासूनच त्याला आपल्या आवडीच्या अभिनय क्षेत्राचे बाळकडू मिळाले. हीच आवड पुढे त्याच्या करिअरमध्ये कशी रूपांतरित झाली, हा त्याचा प्रवास आता आपण मिहीरकडूनच ऐकू या.

**तुझी ओळख आम्हाला कशी करुन देशील ?**

मी मिहीर आपटे, सध्या मी University of Illinois Urbana-Champaign येथे Art Fine Arts (Acting) आणि Economics या विषयांत पदवी शिक्षण घेत आहे. कॅन्ससमधे माझ्या बाबांची The Big Bang Theater ही नाट्यसंस्था आहे. त्याच्या कामासाठी घरात नेहमीच नाटकाचे वातावरण असायचे. गेल्या वर्षी त्यांनी "संगीत संशयकल्लोळ" हे नाटक सादर केले होते. अशा वातावरणात वाढल्यामुळे नाटकाची आवड नकळत माझ्यात रुजली. मिडल स्कूलमध्ये असताना आईने मला अभिनयासाठी प्रोत्साहन दिले आणि तेव्हापासून मी नाटकांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहे.

**तुला या क्षेत्रात करिअर करायचे हे तू कसे ठरवलेस?**

माझे आईवडील टॉक्सिकोलॉजी क्षेत्रात असल्यामुळे त्यांनी मला लहानपणापासून विज्ञान, जीवशास्त्र आणि अभियांत्रिकीच्या जगाशी परिचित करून देण्याचा प्रयत्न केला. पण आतून मला नेहमी वाटायचे की हे क्षेत्र माझ्यासाठी नाही. माझ्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी अभिनयाचाच मार्ग माझ्यासाठी योग्य आहे, हे वाटायचे. अभिनय क्षेत्रात यश मिळवण्यासाठी केवळ आवड पुरेशी नसून, स्वतःच्या कलेची रसिकांकडून दखल घेतली जाणे महत्त्वाचे असते. त्यामुळे शाळेच्या शेवटच्या वर्षांपासून मी अभिनयाकडे अधिक गंभीरपणे पाहू लागलो. त्याच काळात वडिलांनी मला अभिनयाची 'क्राफ्ट' समजून घेण्याचा सल्ला दिला, म्हणजे त्या कलेमागची मेहनत, शिस्त आणि अभ्यास आत्मसात करणे. या दृष्टिकोनामुळे मी अभिनय अधिक मनापासून शिकू लागलो आणि माझ्या अभिनयात प्रगती दिसू लागली. या प्रवासातूनच अभिनयालाच करिअर म्हणून निवडण्याचा माझा निर्णय दृढ झाला.

**हा निर्णय पक्का करण्या साठी कोणाची मदत झाली ?**

ज्युनिअर हायस्कूलमध्ये मी शेक्सपिअरच्या नाटकावर आधारित एका स्कॉटिश शोमध्ये महत्त्वाची साइड भूमिका केली होती. मात्र माझा अभिनय पाहून आई-बाबांनी स्पष्ट सांगितले की, 'तू अजून पुरेसे प्रयत्न करत नाहीस.' तो माझ्यासाठी मोठा वेक-अप कॉल ठरला. त्या काळात आमच्या स्नेह्यांचा मुलगा चिराग मनोहर (मी त्याला दादा म्हणतो) ब्रॉडवेवर यशस्वी कलाकार म्हणून नाव कमावत होता. त्याचे उदाहरण माझे आई-बाबा नेहमी देत असत. त्यानंतर सिनिअर हायस्कूलमध्ये माझ्या कामगिरीत झालेला बदल पाहून ते खूप आनंदी झाले आणि त्यांना वाटू लागले की मी या क्षेत्रात मोठं काही करू शकतो. कॉलेज शोधण्यापासून पुढच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी मला मदत केली आणि नेहमी सांगितले, 'तुझ्यात क्षमता आहे, तू हे नक्की करू शकतोस.'

**तुझा हा अभ्यासक्रम इतर अभ्यासांपेक्षा कसा वेगळा आहे?**

मी इकोनॉमिक्स हा विषयही घेतला आहे कारण मला गणिताची आवड आहे आणि काही ओपन क्रेडिट्स उपलब्ध होते. या विषयात R Code, statistical analysis, normal distribution यांसारख्या संकल्पनांद्वारे अभ्यास केला जातो. आर्ट्सच्या पहिल्या वर्षात सुरुवातीला स्टेजवर काम करण्यापेक्षा अभिनयाची मूलतत्त्वे समजून घेण्यावर भर असतो. ज्युनिअर आणि सिनिअर वर्षांतील "स्टुडिओ" प्रशिक्षणात सकाळी ९ ते १२.३० स्टुडिओ आणि संध्याकाळी ६ ते १० रिहर्सल असे आठवड्यातून ५-६ दिवस काम चालते. येथे अभिनयाच्या तंत्रांवर, पद्धतींवर आणि स्वतःला अधिक सक्षम कलाकार बनवण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. आर्ट्समध्ये आम्ही पात्र समजून घेणे, ते आपल्यापेक्षा कसे वेगळे आहे, त्या भूमिकेत शिरण्यासाठी काय आवश्यक आहे आणि दिलेल्या परिस्थितीत ते पात्र कशी प्रतिक्रिया देईल हे शिकतो. शेवटी, शेक्सपिअर हा आमच्या शिक्षणाचा पाया आहे. अभिनयातील प्रत्येक कौशल्य आम्ही त्याच्या कलाकृतींच्या माध्यमातून आत्मसात करतो.

**तुझा हा अभ्यासक्रम कसा आहे? त्यामध्ये काय समाविष्ट आहे आणि कोणते विषय म्हणजे काय शिकवले जाते?**

आमच्या अभ्यासक्रमात विविध प्रसंगांवर आधारित परफॉर्मन्स वर्गासमोर सादर करावे लागतात. मोनोलॉग हा अभिनयाचा महत्त्वाचा भाग असून, त्याचा उपयोग ऑडिशन आणि व्यावसायिक संधींसाठीही होतो. विद्यापीठातील नाटकांमध्ये स्टेज सेटअप, लाईटिंग आणि इतर तांत्रिक बाबींवर काम करण्याची संधी मिळते, त्यामुळे त्या क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभवही मिळतो. मी सध्या BFA,Bachelor of Fine Arts, मध्ये अभिनय विषयात विशेष शिक्षण घेत आहे, तर

Bachelor in Theater Arts मध्ये नाटक निर्मितीच्या सर्व विभागांचा सखोल अभ्यास केला जातो. जसे की, अभिनय, दिग्दर्शन, सेट डिझाईन, प्रॉप्स, कॉस्च्युम, मेकअप आणि स्टेज मॅनेजमेंट अशा विविध विभागांचा समावेश असतो. माझा मुख्य फोकस अभिनयावर आहे. सीनियर वर्षात "Acting on Camera" हा विषय असेल, ज्यामध्ये कॅमेऱ्यासमोर अभिनय करण्याच्या तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाईल. शेवटी, माध्यम कोणतेही असो, अभिनय हा अभिनयच असतो.

**आता पर्यंतचा तुझा कोणता performance तुला जास्त लक्षात राहीला आहे ?**

काही दिवसांपूर्वी मी Rajiv Joseph यांच्या "Guards at the Taj" या नाटकात अभिनय केला. दोन पहारेकऱ्यांच्या आयुष्याभोवती फिरणाऱ्या या नाटकात मी "बाबर" ही भूमिका साकारली. ही भूमिका माझ्या स्वभावाशी जुळणारी असल्याने ती साकारताना खूप मजा आली. फक्त तीन आठवड्यांच्या सरावात आम्ही नाटक सादर केले आणि संपूर्ण प्रयोग उत्तम झाला. प्रेक्षकांचा प्रतिसादही खूप छान मिळाला. आई, बाबा, आजी आणि माझी बहीण नाटक पाहायला आले होते, आणि त्यांनाही ते खूप आवडले.

**थिएटर आणि फिल्म्स या क्षेत्रातील तुमची आवडती प्रेरणादायी व्यक्ती कोण आहे ?**

माझा ठराविक आयडॉल आयडल नाही, पण Timothée Chalamet आणि Ryan Gosling यांच्या आणि इतर कलाकारांच्या अभिनय शैलीतून मी सतत शिकण्याचा प्रयत्न करतो. माझ्यासाठी माझा खरा रोल मॉडेल चिराग मनोहर आहे. ब्रॉडवेवर काम करणारा पहिला अमेरिकन मराठी कलाकार म्हणून त्याने वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि त्याच्या अनुभवातून मला खूप प्रेरणा मिळते. सध्या थिएटर हीच माझी मुख्य आवड आहे आणि त्यात काम करताना मला सर्वाधिक आनंद मिळतो. भविष्यात चित्रपटांमध्येही काम करण्याची इच्छा आहे

**पुढे काय करायचा विचार आहे ?**

MFA, Master of Fine Arts, सोबत शेक्सपिअरच्या नाटकांमध्ये काम करण्याचा विचार आहे, कारण त्यातून या क्षेत्रात उपयोगी पडणारी कौशल्ये विकसित होतात. अनेक तरुण कलाकारांसाठी हा पुढील प्रवासाचा महत्त्वाचा मार्ग मानला जातो. शेक्सपिअर सादर करण्यासाठी भाषेवर प्रभुत्व आणि उच्च दर्जाची अभिव्यक्ती आवश्यक असते. कलाकार म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी योग्य नियोजन करत न्यूयॉर्कमध्ये करिअर घडवण्याचा मानस आहे. त्याचबरोबर स्वतःची कौशल्ये विकसित करत teaching द्वारे "बाबा" बाबांप्रमाणे एक legacy निर्माण करण्याचीही इच्छा आहे.

**तुझ्या वयाच्या मुलांना तू काय सांगशील?**

माझं कुटुंब खूपच खुल्या विचारांचे आहे. आजी-आजोबा, आई-वडील आणि दादाने माझ्या निर्णयांना नेहमीच पाठिंबा दिला आहे. माझं मत असं आहे की आपण फक्त एकदाच जगतो, त्यामुळे निर्णय स्वतः घ्यावेत आणि मनाला जे आवडतं ते करावं. किमान एकदा तरी आपल्याला आवडतं ते करून पाहायला हवं.


- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा

## BMM Uttarrang Senior Living Communities Database

११ एप्रिल २०२६ रोजी उत्तररंगचा 'Downsizing & CCRC' वर परिसंवाद झाला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतरच्या चर्चेतून असा एक विचार मांडला गेला की आपल्या ह्या पिढीतील लोक हळूहळू 55 Plus Independent living, Assisted Living, Memory Care किंवा CCRC (Continuing Care Retirement Community) मध्ये जाऊ लागले आहेत. पुढल्या ५-१० वर्षात हे प्रमाण वाढेल हे नक्की. आपण कुठल्या facility मध्ये जावं हा निर्णय खूप कठीण असतो. काही वेळेस मुलं तो निर्णय घेतात किंवा आपला आपल्यालाच तो निर्णय घ्यावा लागतो. अशा वेळेस जर आपल्याकडे आपली मराठी माणसं अमेरिकेतल्या कुठल्या राज्यात, कुठल्या facilities मध्ये गेली आहेत ह्याचा तपशील असेल, तर नवीन येणाऱ्या लोकांना त्याचा खूप फायदा होईल आणि म्हणून त्या दृष्टीने आम्ही हे आवाहन करत आहोत. आपल्यापैकी जे सध्या अश्या facilities मध्ये राहत आहेत, किंवा तुमचे आई वडील राहत असतील, किंवा तुमचे ओळखीचे कोणी राहत असतील तर त्यांच्या संमतीने हा form भरून आम्हाला पाठवावा. ह्या माहितीचा एक database उत्तररंग या उपक्रमाद्वारे उपलब्ध राहील व त्याचा लाभ जसा, जेंव्हा, ज्यांना, लागेल तसा घेता येईल.

उद्देश एकच की आपली मराठी माणसं उतारवयातही एकमेकांना सोबत म्हणून राहू शकतील. तुमचं नाव व facility चे नाव हे आवश्यक असेल, पण तुम्हाला नवीन येणाऱ्या कुटुंबाने तुमच्याशी अधिक माहितीसाठी किंवा तुमचा अनुभव जाणण्यासाठी संपर्क साधलेला चालणार असेल तर तसे नमूद करावे.

Form: https://forms.gle/eVL5N6QqsSQhuB4Y6


BMM मराठी युवा
– समर मेंटरशिप प्रोग्राम २०२६
मराठी युवांसाठी एक अनोखी संधी! Brihan Maharashtra Mandal तर्फे आयोजित
८ आठवड्यांचा Online Summer Mentorship Program सुरू होत आहे.
Available Tracks
Core Engineering
Software / AI / Data Science
Performing Arts / Drama / Instrument
Healthcare
Entrepreneurship
Essay Writing
Registration Window
९ मे २०२६ ते ९ जून २०२६
Kickoff Ceremony
गुरुवार, ११ जून २०२६, ८:०० PM EST (Zoom)
Program Dates
२० जून – २० ऑगस्ट २०२६
विद्यार्थी एकाधिक ट्रॅकसाठी नोंदणी करू शकतात.
सर्व सत्र पूर्णपणे Online over Zoom Communications घेतले जातील
नोंदणीसाठी को क्यूआर कोड स्कॅन करा.
SCAN ME
https://www.zeffy.com/en-US/ticketing/bmm-yuva-summer-internship--2026
विद्यार्थी, पालक आणि मराठी युवा गटांसह शेअर करा.


आरोग्य संपदा
MEDICAL INTERNSHIP /
SHADOW PROGRAM IN INDIA
July – August 2026
1-4 Week Internship / Shadowing Opportunities
Placement Based on Student Preferences
Accommodation Assistance Available if Needed
Safe Learning Experience, Gain Hands-On Insight!
Limited Spots – Apply Now!
Nominal Admission Fee | Students Arrange Own Travel
If interested – please fill out the form at
https://bmmonline.org/arogyasampada/



बृहन्महाराष्ट्र मंडळ
BMM SUMMER
PROGRAMS FOR STUDENTS
Learn
Explore
Lead
Serve
Yuwa Summer Mentorship
Mandal Yuwa Summer Program
Summer Volunteering in India
Medical Internship in India
Maharashtra Cultural Tour
Summer Cricket Camp
Cultural Study Program
To find more information, please visit:
https://bmmonline.org/summer-programs/
Discover New Opportunities
Build Leadership
Connect with Your Roots
Create Lifelong Memories




BMM of North America
ELECTIONS
BMM ELECTIONS 2026
18 CANDIDATES • 10 LEADERSHIP POSITIONS
The race to shape BMM's future is underway!
Discover the candidates
Understand their vision
Stay informed about the election process
Visit:
www.bmmonline.org/elections
INFORMED VOTERS BUILD A STRONGER BMM




## परदेशातील वारी पंढरीची

।। जय जय राम कृष्ण हरी ।।

तुम्हाला माहीतच आहे की दरवर्षी देहू व आळंदी येथून हजारो वारकरी, आषाढी एकादशीच्या निमित्ताने, पंढरपूरच्या वारीला जातात. देहू/आळंदी ते पंढरपूर हे अंतर अंदाजे १५० मैलांचे आहे (अंदाजे २५० किलोमीटर) – हे अंतर वारकरी १९ ते २० दिवसात पूर्ण करतात.

गेले काही वर्षे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "परदेशातील वारी पंढरीची" हा उपक्रम आपण सुरु केला आहे. यावर्षीही आपण वारीच्या दरम्यान जेवढे जमेल तेवढे अंतर, तेवढ्याच कालावधीत (जवळजवळ तीन आठवड्यात) पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ढोबळ मानाने दररोज २, ४, ६, किंवा ८ मैल चालले तर अनुक्रमे वारीचे २५, ५०, ७५, किंवा १००% अंतर पूर्ण होईल. कुटुंबातील मंडळी एकत्रितपणे चालूनही १००% अंतर पूर्ण करू शकतात. (उदाहरणार्थ: आई, वडील आणि दोन मुलांनी दररोज २ मैल चालले तरी एकत्रितरित्या वारीचे १००% अंतर पूर्ण होईल).

या उपक्रमाबद्दलची सर्व माहिती तसेच वारी बद्दलचे वेळापत्रक बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे: https://bmmonline.org/samajrang/ (Please click on "Wari 2026" tab)

तुम्हाला तसेच तुमच्या मंडळातील सर्वांना वारीच्या शुभेच्छा!!!


- **प्रसाद पानवळकर**, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

## पितृ दिन

ए बाबा, तुझ्यासाठी
आहे आज एक दिवस
जागतिक पातळीवर
साजरा करतील लेक अनेक
नाही ऐकले आपल्या
देशी आज पर्यंत कसे
बाबाने आपले कर्तव्य
पार पाडले नाही असे
तोच माझ्यासाठी
होता सदा सावली
आठवण फक्त त्याची
आता मनी राहिली
पुन्हा एकदा घेऊन
ये ना बाबाला देवा
माझ्या घरी आणून
करायला त्याची सेवा
लिहावेसे वाटले या क्षणी
मन माझे भिजलेले
सश्रद्ध नमन बाबांना,
पण नयन भरलेले
देते हृदयपूर्वक शुभेच्छा
झाले आहेत जे पिता
आनंद घ्यावा माझ्या कवितेचा,
आवडली ना कविता

- **सौ. रेखा मुळे**, मनालपन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## आनंदाचे देणे



आनंदाचे देणे या लेखमालेत मागील काही लेखांमधून आपण आपल्या वाट्याला आलेल्या कामातून आनंद घेण्यासाठी आणि इतरांना आनंद देण्यासाठी नेमके काय करायचे याबाबत जाणून घेत आहोत. आपले काम चांगले करण्यासाठी आणि उत्कर्ष साधण्यासाठी माणसाकडे 'कल्पकता' असणे का गरजेचे आहे याबद्दल आपण याआधी जाणून घेतले. या लेखात याबाबत आणखी थोडे सविस्तर जाणून घेणार आहोत.

कल्पकतेचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी येत असतो. आजवर जगभरात जे नवनवीन शोध लागले आहेत ते कल्पकतेतून लागले आहेत. कल्पकतेला जन्म अंतर्मन देत असते. कल्पकता ही उत्कर्ष साधण्याची एक महत्त्वाची पायरी आहे. जो आपले काम कल्पकतेने करतो त्याला भरभरून यश मिळते.

आपले काम कल्पकतेने करण्यासाठी त्या कामाबद्दल सतत चिंतन करणे गरजेचे आहे. चिंतनातून कल्पकता उदयाला येते. आपल्याला का? (Why?) हा प्रश्न सतत पडला पाहिजे. कारण जोपर्यंत या 'का' चे आपण उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणार नाही तोपर्यंत चिंतन घडणार नाही. गंमत म्हणजे चिंतन करतो आपण पण त्या चिंतनातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांना उत्तर देत असते अंतर्मन. चिंतनातून तुम्ही एखाद्या गोष्टीचा सखोल अभ्यास करु लागता. चिंतनातून तुम्हाला नवनवीन कल्पना सुचतात आणि समोर निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मिळू लागतात. कारण तुम्ही जेव्हा अभ्यास करता, चिंतन करता तेव्हा तुम्ही तुमच्या अंतर्मनाला खाद्य पुरवित असता. अंतर्मनाला असे खाद्य मिळाले की ते कामाला लागते. अंतर्मन प्रचंड शक्तिशाली आहे. त्यामुळे तुम्हाला पडलेल्या प्रश्नाची उत्तरे मिळू लागतात. पण त्यासाठी सतत ज्ञान मिळविणे, चिंतन करणे गरजेचे आहे. चिंतनाची क्रिया सतत सुरू राहिली पाहिजे. कारण अंतर्मन तुम्हाला कधी आणि कसे उत्तर देईल हे सांगता येत नाही. मग कधी एखादी व्यक्ती येऊन तुम्हाला मदत करून जाईल, कदाचित ती परिस्थिती बदलेल आणि तुमचे काम सोपे होईल किंवा कधी तुम्हाला ते एखादी संधी उपलब्ध करुन देईल ज्यामुळे तुमची व्यवस्था होईल. अंतर्मन कधी मदत करेल हे आपल्या हातात नाही पण ज्ञान मिळविणे, अभ्यास करणे आणि चिंतनाला गती देणे मात्र आपल्या हातात अवश्य आहे.

एखाद्या गोष्टीचे चिंतन केले की मग त्या कामातून मिळणाऱ्या परिणामांचा विचार करीत बसू नका. कसं होणार? कधी परिणाम मिळणार? कोणाकडून मदत मिळणार? या विचारांमध्ये स्वतःची उर्जा वाया घालवू नका. कारण चिंतन हा चिंतामणी आहे. तुम्ही योग्य पद्धतीने चिंतन केले की अंतर्मन तुम्हाला अचूक मार्ग दाखवणारच हा विश्वास ठेवा. यालाच 'आतला आवाज' किंवा 'इन्ट्यूशन' असे म्हणतात. लक्षात ठेवा! तुम्हाला मदत करण्यासाठी अंतर्मन सक्षम आहे.

यासंदर्भात एक उदाहरण सांगतो. ज्यावरून अंतर्मन आपल्याला कशा प्रकारे मदत करण्यास तत्पर असते हे तुमच्या लक्षात येईल. बेन्झींग रिंग (Benzene Ring) संरचना हा सेंद्रिय रसायनशास्त्रामधील एक मूलभूत सिद्धांत आहे. या सिद्धांताचा शोध जर्मन रसायनशास्त्रज्ञ फेडरिक ऑगस्ट केकुले (Friedrich August Kekulé) याला लागला. फेडरिकचा यासंदर्भात अभ्यास सुरु होता. तो या संकल्पनेबाबत सखोल चिंतन करीत होता. पण काही केल्या त्याला अपेक्षित उत्तर मिळत नव्हते. अनेक दिवस झाले तरी तो या विषयाबाबत चिंतन करीतच राहिला. एके दिवशी चिंतन करीत असताना त्याला अचानक झोप लागली आणि त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात त्याला एकमेकांची शेपटी तोंडात पकडलेल्या सर्पांचे चित्र दिसले. असे म्हणतात की या चित्रातूनच त्याला बेन्झींग रिंग संरचना सुचली. काही लोक याला चमत्कार असे म्हणतील पण वास्तविक हा अंतर्मनाचा अविष्कार आहे. फेडरिकने केलेल्या सखोल चिंतनाला अंतर्मनाने उत्तर दिले होते. कारण कल्पकता ही जाणीवपूर्वक प्राप्त होत नाही. चिंतनातून ती अंतर्मनाकडून नेणीवपूर्वक (automatic) प्रकट होते. कल्पकता ही एक दैवी किंवा अद्भुत गोष्ट आहे. मग ही कल्पकता कशी मिळवायची? तर कल्पकता साध्य करण्यासाठी चिंतन करणे महत्त्वाचे आहे. तुम्ही ज्या क्षेत्रात काम करीत आहात त्या क्षेत्रातील अधिकाधिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा आणि मिळवलेल्या ज्ञानावर सखोल चिंतन करा. ज्यातून तुम्हाला नवनवीन कल्पना सुचतील आणि तुमची प्रगती होईल.

जी माणसे मोठ्या हुद्द्यावर असतात ती नेहमी जबाबदारीने काम करतात. आपल्या आयुष्यातील कितीतरी वेळ आपल्या कामासाठी, कंपनीसाठी आणि आपल्या सहकाऱ्यांसाठी देतात. जे लोक आपले काम कर्तव्यबुद्धीने, कल्पकतेने आणि कौशल्याने करतात ते जीवनात उच्च प्रतीचे यश गाठतात. या लोकांचा जीवनात उत्कर्ष होतो. त्यामुळे मोठे पद हवे असेल, चांगला रोल पाहिजे असेल आपल्या कामाबाबत सतत चिंतन करायला हवे. काम करताना कल्पकता वापरायला हवी.

कल्पकतेबाबत आणखी एक उदाहरण सांगतो. आजकालच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात ऑटोमोबाईल उत्पादन कंपन्यांमध्ये गाड्यांना रंग देण्याचे काम स्वयंचलित रोबोटद्वारे केले

जाते. या पद्धतीने गाडीला जेव्हा रंग दिला जातो तेव्हा त्या रंगाचा काही भाग हवेत उडतो (Overspray) आणि जमिनीखाली असलेल्या पाण्याच्या टाकीत जमा होतो. पाण्यात रंग मिसळल्यामुळे ते पाणी नंतर शुद्ध करुन घ्यावे लागते. पाणी शुद्ध करण्यासाठी प्रचंड प्रमाणात वीज वापरली जाते. अनेक कार निर्मिती करणाऱ्या कंपन्या ओव्हरस्प्रेसाठी पाण्याचा पडदा (Water Curtain) वापरतात. ज्यामुळे रंगाचे कण पाण्याद्वारे शोषून घेतले जातात. साहजिकच यामुळे रासायनिक सांडपाणी (Sludge) तयार होते. या सांडपाण्याची विल्हेवाट लावणे सहज सोपे नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचे प्रदूषण निर्माण होते. एकदा एका कंपनीने या समस्येवर कल्पकतेने उपाय शोधून काढला. या कंपनीने 'ड्राय स्क्रबर' (Dry Scrubber) तंत्रज्ञानाचा वापर करून गाड्यांना रंग लावण्याची पद्धत वापरण्यास सुरुवात केली. यासाठी त्यांनी रंगकाम करताना पाण्याचा वापर करण्याऐवजी चुन्याची पावडर (Limestone Powder) वापरली. पेंटिंग बूथच्या खाली असलेले पाण्याचे प्रवाह काढून तिथे दगडाच्या चुन्याची बारीक पावडर पसरली. असे केल्याने रोबोट जेव्हा गाडीला रंग देतो तेव्हा हवेत उडणारे रंगाचे कण चुन्याच्या पावडरमध्ये अडकू लागले. रंग मिसळलेली ही चुन्याची पावडर पुढे त्यांनी नंतर सिमेंट कंपन्यांमध्ये कच्चा माल म्हणून विकली. अशा प्रकारे रंगकामाचा खर्च वाचला, पर्यावरणाचे रक्षण झाले आणि तयार झालेला कच्चा माल पुर्ननिर्मितीसाठी वापरता आला.

कल्पकता वापरुन उत्पादन क्षेत्रात चांगली प्रगती साधता येऊ शकते. मात्र त्यासाठी मोठमोठ्या पदावर असलेल्या लोकांनी कल्पकतेने उपाय शोधून काढायला हवे. जेव्हा फक्त हातातील काम पूर्ण करणे हाच काम करणाऱ्या लोकांचा उद्देश नसतो तेव्हा त्याच्याकडून कामाबद्दल निरनिराळ्या प्रकारे चिंतन केले जाते. आपले काम अधिक चांगल्या प्रकारे कसे करता येईल. आपल्या कामातून सर्वांचा, कंपनीचा, ग्राहकाचा कसा फायदा होईल. आपले काम पर्यावरणाला पूरक आणि पोषक कसे होईल याबाबत त्यांच्याकडून विचार केला जातो. याच चिंतनातून कल्पकता उदयाला येते. कल्पकतेतून समोर आलेली कोणतीही कठीण समस्या सहज सुटू लागते.

उत्कर्ष साधण्यासाठी, आपल्या कामातून आनंद घेण्यासाठी आणि इतरांना आनंद देण्यासाठी असेच आणखी काय काय करता येऊ शकते याबाबत आपण पुढील लेखात जाणून घेऊ या.

- **प्रल्हाद वामनराव पै**, आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## स्वर संजीवनी



या वर्षीच्या जानेवारी मध्ये महाराष्ट्रातील काही रेडिओ स्टेशनांवर माझा "स्वर संजीवनी" हा दैनिक कार्यक्रम सुरु झाला. प्रत्येक कार्यक्रमात शास्त्रीय संगीतातील एक राग सादर करायचा आणि त्याच बरोबर हा राग ऐकल्याने कोणत्या व्याधीसाठी उपाय होतो, हे स्पष्ट करायचे असे या "स्वर संजीवनी" कार्यक्रमाचे स्वरूप आहे. कार्यक्रम श्रोत्यांना कसा वाटतो याबद्दल मला कुतूहल होते. कार्यक्रम सुरु झाल्यानंतर दोन तीन आठवडे गेले आणि एक दिवस अचानक खालील संदेश आला. हा संदेश एका रेडिओ स्टेशनच्या संचालकांनी स्वतः लिहिला होता.

"नमस्कार सुहासजी, तुमचा आवाज आणि गायन फार सुंदर आहे. पुरिया रागात केलेली आलापी आणि नंतरची देवी स्तुती "चंद्रघंटा चंडास्त्र... " किती लीलया तुम्ही म्हणता याचं आश्चर्यच वाटतं. श्वास नियंत्रण, दम आणि लय हे ऐकतांनाच आम्हाला दम लागतो.... म्हणायचं राहू दे. देवी स्तुती तुम्ही फार सुंदर गायली आहे. तुमचे शब्द नंतर गुंजत रहातात. कार्यक्रमाची श्रोतृ संख्या कायम टिकून आहे आणि वाढत ही आहे. अनेकांनी कार्यक्रम आवडल्याचं कळवलं आहे. एका जाणकार श्रोत्याने आईनं अंगाई गीत गाऊन बाळाला जोजवत झोपवावं असं कार्यक्रम ऐकतांना वाटतं असं कळवलं आहे. मुंबई पोलीस दलात असलेले एक रसिक यांनी कार्यक्रमाची वेळ वाढवता येईल कां असं विचारलं आहे. त्यांना फारच आवडला हा कार्यक्रम. मी म्हणालोच त्यांना की आख्या पोलीस दलानंच तणाव मुक्तीसाठी हा कार्यक्रम ऐकला पाहिजे! उत्तम आणि उपयुक्त अशा एका सुंदर कार्यक्रमाची निर्मिती तुम्ही केली आहे आणि त्यासाठी तुम्हाला अनेक धन्यवाद."

वरील संदेश बघून खूप आनंद झाला आणि आपण जे काही करतोय ते योग्य ठिकाणी पोचत आहे अशी जाणीव झाली. मन थोडेसे भूतकाळात गेले. २०२३ च्या नोव्हेंबर मध्ये पुण्यातील एका मित्राला निद्रा नाशाचा त्रास होता म्हणून त्याला राग दरबारीचा आलाप ध्वनिमुद्रित करून पाठवून दिला आणि ते नियमित ऐकल्यानंतर त्याला झोप येऊ लागली. नंतर न्यू जर्सीतील एका डॉक्टर व्यक्तीला निद्रा नाशाचा त्रास होता. तिला तेच राग दरबारीचे ध्वनिमुद्रण पाठवून दिले

आणि तिला सुद्धा आराम मिळाला. या अनुभवामुळे माझे डोळे उघडले!

त्यानंतर माझे संगीत क्षेत्रातले मित्र शैलेश चिरपुटकर (पेटी), मधुकर क्षीरसागर (बासरी), गोपाल कल्लुरी (तबला) आणि त्याचप्रमाणे प्रख्यात संगीतोपचार तज्ञ डॉ. आसावरी ठोंबरे यांनी एकत्र येऊन "Raag and Rhythm for Health" या उपक्रमाची सुरुवात केली. केवळ समाज सेवा या दृष्टीने आपण एक पॉडकास्ट दरमहा विनामूल्य पाठवू असे ठरवून, १ जून २०२४ रोजी उत्साहवर्धक, प्रेरणादायी असा बैरागी भैरव राग घेऊन, आमचा पहिला पॉडकास्ट WhatsApp द्वारे प्रक्षेपित केला.

त्यानंतर दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एका विशिष्ट व्याधीवर उपाय म्हणून एक पॉडकास्ट प्रक्षेपित करत आहोत. आत्तापर्यंत पित्त किंवा ऍसिडिटी साठी कोमल रिषभ आसावरी आणि जौनपुरी, निद्रानाशासाठी दरबारी, मालकौंस आणि बागेश्री, रक्तदाबासाठी यमन आणि मधुवंती, मधुमेहासाठी श्री, आणि दैनंदिन ताण तणाव कमी करण्यासाठी पुरिया, भैरव, अहिर भैरव, बिलासखानी तोडी, ग्यानकली असे अनेक पॉडकास्ट आम्ही विनामूल्य श्रोत्यांना पाठवले आहेत. आमचे श्रोते अमेरिका, भारत, यूरोप, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया असे सर्वत्र आहेत आणि मिळालेला प्रतिसाद खूपच चांगला आहे.

कित्येक श्रोत्यांनी पॉडकास्ट नियमित ऐकल्यानंतर मनाची अस्वस्थता कमी झाली आणि रात्री स्वस्थ झोप येऊ लागली असे कळवले आहे. भारतातील एका तरुणाला चिकनगुन्या चा आजार झाला तेव्हा पॉडकास्ट ऐकून वेदनांचा विसर पडला आणि मनाची सकारात्मकता वाढली असे कळवले आहे. कित्येक जणांना सर्जरी झाल्यानंतर तब्येत सुधारणा होण्यासाठी आमच्या पॉडकास्ट चा उपयोग झाला आहे. असा चांगला प्रतिसाद येत असल्यामुळे आमच्या टीम ला "Raag and Rhythm for Health" हा उपक्रम चालू ठेवण्यासाठी खूप प्रेरणा मिळाली आहे.

श्रोत्यांना "Raag and Rhythm for Health" या उपक्रमाची माहिती आत्तापर्यंत बऱ्याच माध्यमातून दिली आहे. उदाहरणार्थ बृहन महाराष्ट्र मंडळ उत्तररंग तर्फे झालेला "स्वर संजीवनी" कार्यक्रम, चिन्मय मिशन (कॅलिफोर्निया), अर्वा योग (पेनसिल्वानिया), स्टर्लिंग पॉईंट (न्यू जर्सी) इथे प्रात्यक्षिक आणि माहितीपर कार्यक्रम झाले. फेब्रुवारी २०२६ मध्ये पुण्याला भारतीय सैन्यातील जवानांसाठी जेव्हा कार्यक्रम झाला तेव्हा सुद्धा दैनंदिन ताण तणाव होण्यासाठी संगीत कशी मदत करते हे प्रात्यक्षिक करून दाखवले.

कार्यक्रम सुरु झाल्यानंतर आता दोन वर्षात श्रोत्यांची संख्या किती तरी पटीने वाढली आहे. त्याचे कारण म्हणजे गेल्या वर्षी जून पासून अमेरिकेतील इ-प्रसारण इंटरनेट रेडिओ आणि टेलिव्हिजन वर, जानेवारी पासून रेडिओ विश्वास (नाशिक), मराठी तरंग (सांगली) आणि तसेच रेडिओ नगर (अहिल्या नगर), इथे पॉडकास्टचे प्रसारण नियमित पणे चालू आहे. आणि त्यापासून मिळणारा श्रोत्यांचा प्रतिसाद खूप छान आहे.

या वर्षी मार्च मध्ये, श्रोत्यांना व्याधीवर संगीतोपचार करणारे पॉडकास्ट पटकन शोधता यावेत म्हणून "CureTune" हे App आम्ही बनवले आहे. हे App, Artificial Intelligence तंत्रज्ञान वापरून तयार केले आहे. तुम्ही "Anxiety" असे App च्या स्क्रीन वर टाकले की "Anxiety" वर उपयुक्त असे पॉडकास्ट त्याचप्रमाणे इतर रेकॉर्डिंग तुम्हाला मिळतील. हे App विनामूल्य आहे. आम्ही पूर्वी प्रसिद्ध केलेले सर्व पॉडकास्ट तसेच आगामी सर्व पॉडकास्ट "CureTune" मधून ऐकता येतील. भविष्य काळात संस्कृती संवर्धन होईल असे संगीत आम्ही "CureTune" द्वारे सादर करू. तसेच विशिष्ट परिस्थिती साठी उपयुक्त असे संगीत, श्लोक आणि स्तोत्रे आम्ही श्रोत्यांसमोर आणू. उदाहरणार्थ "बाळ रडतंय " असे जर म्हटलं तर बाळाला शांत करण्यासाठी योग्य असे संगीत आम्ही ऐकवू.

संगीत हा आपल्या संस्कृतीने दिलेला एक अमूल्य ठेवा आहे. संगीतातील स्वरांमुळे कफ, वात आणि पित्त यांच्या मधील समतोल साधला जातो हे आयुर्वेद सांगतो. स्वरांच्या शक्तीचा आपल्या शरीरातील चक्रांवर सकारात्मक परिणाम होतो. मानसिक आणि शारीरिक आरोग्य टिकवण्यासाठी संगीत ही संजीवनी आहे.

तुम्हाला जर "CureTune" App हवे असेल किंवा दर महिन्याला प्रसिद्ध होणारा सांगीतिक पॉडकास्ट हवा असेल तर कृपया तुमचे नाव आणि मोबाइल नंबर ई-मेल ने emailCureTune@gmail.com या पत्यावर कळवा. तुमच्या काही सूचना किंवा प्रश्न असतील तर जरूर वरील पत्यावर ई-मेल पाठवा. धन्यवाद.

- **सुहास जोशी**, मॉन्टव्हिल, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## दिवाळी अंक आवाहन २०२६

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्तातर्फे प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकाचे हे गौरवशाली ४३ वे वर्ष आम्ही पुन्हा एकदा दिमाखात साजरे करत आहोत. या निमित्ताने, उत्तर अमेरिका तसेच भारतातील सर्व मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकार आणि साहित्यप्रेमींना 'बीएमएम वृत्त दिवाळी अंक २०२६' साठी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आपले लेख, कथा, कविता, लघुनिबंध, नर्म विनोद, चुटके, प्रवासवर्णन, पाककृती तसेच कलात्मक रेखाचित्रे आम्हाला अवश्य पाठवावीत. या अंकाला अधिक समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि बहुरंगी बनविण्यासाठी आपले मौलिक योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे आपली सर्जनशील अभिव्यक्ती व कल्पकता जगभरातील वाचकांसमोर सादर करण्याची ही एक अनमोल संधी आम्ही आपणांस उपलब्ध करून देत आहोत.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: ३० ऑगस्ट २०२६**

**अपेक्षित साहित्य व मर्यादा:**

- कथा / लेख / निबंध: १००० शब्द (फोटोशिवाय)
- कथा / लेख / निबंध: ८०० शब्द (फोटोसह)
- चुटके: १५० शब्द
- पाककृती / संकीर्ण माहिती: ३०० शब्द
- कविता: २० ओळी
- चित्रे / व्यंगचित्रे: उच्च प्रतीची डिजिटल प्रत

**मार्गदर्शक सूचना:**

- साहित्य स्वतःचे, मूळ मराठी भाषेत असावे आणि पूर्वप्रकाशित नसावे.
- अनुवादित किंवा रूपांतरित साहित्य असल्यास मूळ लेखकाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
- निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
- आवश्यकतेनुसार संपादकीय बदल करण्याचा अधिकार संपादकांकडे राखीव आहे.
- निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.
- लेखकांनी नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

**साहित्य पाठवण्याचा ई-मेल:** vrutta@bmmonline.org

**ई-मेल विषय:** "Diwali Ank 2026"

**सूचना:**

1. मराठीत टायपिंग करण्यासाठी www.google.com/transliterate वापरता येईल व नंतर ते Word मध्ये सेव्ह करून ई-मेलद्वारे पाठवावे.

2. जर कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने वापरली जात असतील, तर ती अत्यंत सावधगिरीने वापरली जावीत; जेणेकरून मजकुराचा ओघ, मौलिकता आणि अस्सलपणा अबाधित राहील आणि त्यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही.

3. बहुतांश लेख हे लेखकाच्या स्वतःच्याच आवाजात रेकॉर्ड केले जातात. तुमचा लेख निवडल्यास, तुम्हाला एक रोमांचक संधी - 'व्हॉईस-ओव्हर आर्टिस्ट'प्रमाणे तुमचा स्वतःचा ऑडिओ रेकॉर्ड करा. यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती तुम्हाला पुरवली जाईल.

आपल्या उत्तम आणि वैविध्यपूर्ण साहित्याच्या प्रतीक्षेत,
आभारी आहोत,

**- बीएमएम वृत्त टीम**



## अजरामर

*“आयेगा आयेगा आनेवाले आयेगा .....*

**आई:** विद्याधर, अरे पोहे आणि चहा गार होतो आहे अरे... लक्ष कुठे आहे तुझे? आज त्या संगमनेरकरांना काय ठरले तुमचे ते कळवायचे आहे. तुला आवडली का त्यांची लेक?
अहो, तो रेडिओ बंद करा आधी. आनेवाले आलेले आहेत. हा घ्या तुमचा गरम पाण्याचा ग्लास.

**विद्याधर :** “बाबा, अहो आजची बातमी वाचलीत का? काय चालले आहे या जगात ? दोन दिवस उसंत मिळत नाही. आज काय तर अमुक देशाने तमुक देशावर तोफ ताणली व आपल्या सगळ्यांना विमान प्रवास जीवघेणा होतो की काय असे विचार मनात येऊ लागले. त्या आधी जागतिक व्यापार कसा होणार या विचाराने महागाई वाढली आता पेट्रोल महागले व प्रगत असून चूल पेटवावी लागली. सामान्य माणसाने जगावे का ? का जगावे?

**बाबा :** अरे विद्याधर, असे टोकाचे विचार नको. अनेको जन्म मानवाने एकमेकांवर हल्ले चढवले आहेत पण तरीही मानव जाती आपला तग धरून उभी आहे.

**आई:** अरे तुझ्या जन्माच्या आधी भारत युद्धात उतरले होते. त्यावेळेस तू माझ्या पोटात होतास. तुझे बाबा इंडियन ऑइलमध्ये. आम्ही दोघे डेपोच्या परिसरात राहायला होतो. कधी हल्ला होईल माहीत नसायचे. तरीही तुझा त्याग करावा असे कधी वाटले नाही. उलट तुझ्या संरक्षणासाठी, त्या नवीन जीवनासाठी कुठलीही धडपड करण्यास आम्ही तयार होतो.

**बाबा:** विद्याधर, असे अनेक वारे येतात आणि जितक्या पटकन आले तितक्या पटकन पसार होतात. रोज वर्तमानपत्र काही ना काही दुर्घटना नमूद करतच असते म्हणून काही आपण जगणे सोडायचे का?

**विद्याधर:** बाबा तुम्हाला म्हणणे सोपे आहे .... या रोजच्या घडामोडींनी माझे ऑफिसचे ट्रॅव्हल स्ट्रेसफुल केले आहे. पेट्रोलची लाईन, सिग्नलची गर्दी, उन्हाची तीव्रता, पोल्युशन, त्यावर सर्वत्र चालणारे कोपऱ्याकोपऱ्यावर चालू कन्स्ट्रक्शन यांना रोज झुंज देत देत कशीबशी मी ऑफिसची वेळ गाठतो.

**बाबा:** अरे प्रगतीचे पथ हे विविधरंगी असते. वेगवान गतीसाठी थोडी मेहनत मजुरी आणि सबुरी लागते. आधी आईच्या प्रश्नाचे उत्तर दे नाही तर तुला माहित आहे इथून तुझी सुटका नाही.

**विद्याधर:** आई अग काय सारखा तोच प्रश्न विचारते? इथे माझीच शाश्वती नाही असे वाटते आहे. मला तर वाटते की या अनैतिक वातावरणात सगळं काही संपुष्टात येणार आहे. मरण पावलोपावली उभं असताना का मी नवीन जीवन या धरेवर आणू? तुम्हीच दोघे सांगा मला एक नवीन जीवाला मी या stressful वातावरणात आणून काय मिळणार मला किंवा तुम्हाला?

**आई:** अरे stress हा घेतला तर आहे आणि नाही घेतला तर नाही. तो प्रत्येक जण आपापल्या मते ठरवतो.

**विद्याधर:** आई जरी मी तुझे म्हणणे मानले तर मोस्ट इम्पॉर्टन्ट गोष्ट हीच आहे की सगळं जीवन शेवटी अंत गाठते. मरण हे निश्चित आहे तर का ह्या जीवनाचे उतार चढाव बघावे? शेवटी सगळं सोडून जायचे तर मग जमवायचेच का?

**बाबा:** अगं कला, तुला इम्पॉर्टन्ट काय ते कळले ना. आता मी म्हणतो ते पटले ना तुला. माझे सासरे आहेत ह्याच्या रूपात. कोथळा काढणार नेहमी.

**विद्याधर:** बाबा काही पण काय? आजोबा आणि मी वेगळे व्यक्ती आहोत. त्याचा माझ्याशी काय संबंध.

**बाबा:** पहा पहा कला. प्रत्यय मिळाला तुला 🙂

**आई:** विद्याधर, तुझ्यातल्या माझ्या स्वर्गीय बाबांना नमन.

**विद्याधर:** आई तू पण believe करतेस का या सगळ्या supernatural गोष्टी? तू तर विख्यात सायंटिस्ट आहेस मग हे कसे म्हणतेस?

**आई:** विद्याधर, अरे genetics आहे ते. बाबा तसे बोलतात कारण शैली आहे ती. प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने संवाद साधतात. बाबा अश्या शैलीत बोलतात. ते काही अवहेलना करत नाहीत माझ्या बाबांची किंवा तुझी. माझे बाबा हे फार प्रॅक्टिकल भाषेत बोलायचे. स्वतः डॉक्टर होते त्यामुळे core of the matter या शैलीत बोलायचे. अर्थात मुद्देसूद बोलणे हि त्यांची शैली. वायफळ मुद्दे ते मांडत नसत आणि कोणी काही विचारले तर डायरेक्ट आहे ते सत्य सांगत. कधी कधी ते कडू सत्य कठीण जाते ना समजायला. तू त्या शैलीत बोललास म्हणून बाबा तुला आजोबा म्हणाले. खरं तर तुझ्या बाबांची किंवा माझी तशी बोलण्याची पद्धत नाही. मग तू कुठून शिकलास तसे बोलणे?

**विद्याधर:** आई माझा प्रश्न चुकला आहे असे वाटते का तुला?

**आई:** अजिबात नाही. मी वेगळ्या प्रकारे मार्गदर्शन करते. बघ तू कुठपर्यंत पोहचतोस. विद्याधर हा जीव किंवा देह हा माझ्या ‘X’ व बाबांच्या ‘Y’ chromosomes ने एकत्र येऊन तयार झाला. बरोबर? सायन्स आहे ते. म्हणजे विद्याधर हा ५०% आई अधिक ५०% बाबा. अर्थात survival of the fittest लागू आहे. आमच्यातले जे उत्तमोत्तम ते तुझ्यात उतरले. वर्ण तुझा, माझ्यासारखा पण अंगयष्टी बाबांची. केस माझ्यासारखे दात तर बोटे बाबासारखी नाजूक

व लांब. तसेच स्वभाव पण. माझ्यासारखा झुंज देणारा आणि बाबांसारखा संवेदनशील. त्यांच्यासारखे न सांगता तुला समजून घेता येते की कोणाला काय हवे आहे. मग हा मुद्देसूद संवाद हा माझ्या X मधून आला आहे. माझ्यात डॉमिनंट नाही पण तुझ्यात आला तो गुण. कसा ? कारण माझा X हा ५०% आजी आणि ५०% आजोबा यातून तयार झाला आहे. अर्थात बाबा म्हणतात ते scientifically खरे आहे. २५% आजी आणि २५% आजोबा तुझ्यात आहते.

**बाबा:** विद्याधर, अरे निघ आता ऑफिसला नाही तर उशीर होईल.

**विद्याधर:** हो. आई, मला पोहे डब्यात देतेस का?

मी रिक्षेत बसून विचार करू लागलो. एकात एक गुंतलो आहोत आपण. मी २५% आजी व आजोबा तर १२.५%पणजोबा आणि ७.२५% खापर पणजोबा आणि ३.१२५% खापर खापर पणजी आणि १.५६२५% खापर खापर खापर त्याच्या खोलात गेलो तर ७ वी पिढी मी गाठली. अर्थात ७ पिढ्या ही म्हण का प्रचलित आहे ते मला कळले. माझे Genetic Composition ७ पिढ्यांपर्यंत बलवत्तर आहे. त्या नंतर ते अंशात्मक असल्याने माझ्यात ते गुण आढळण्याची शक्यता कमी. Wow आई तू खरंच Genius आहेस. माझा स्वभाव व देहास असणाऱ्या व्याधी हे माझ्या पश्चात पुढच्या ७ पिढ्या अनुभवू शकतात. म्हणून डॉक्टर नेहमी वंशावळीत असणाऱ्या आजारपणाची माहिती घेतात.

पण मी अजून मागे जाऊ शकतो. अंशात्मक का असेना मी माझे कुळ व त्याचा उगम गाठू शकतो आणि तीच दोरी धरून चालत गेलो तर माझे गोत्र अर्थात व त्याही पलीकडे सप्तर्षी व त्याही पलीकडे मनू - ज्यातून मनुष्य जातीचा उगम मानला आहे तिथपर्यंत पोहोचू शकतो. तसे पहिले तर मी अमर नाही अजरामर आहे.

**रिक्षावाला:** दादा आले तुमचे हापिस. काय मरणाची गर्दी आहे रस्त्याला. तरी आणला मी तुम्हाला वेळेत.

**विद्याधर:** हो रे दादा. अजरामर आहोत रे आपण सगळे. अजरामर!

*हा लेख श्री स्वामी समर्थांच्या श्री गुरुलीलामृत अध्याय ५० मधील तत्त्वबोधावर आधारित आहे. मूळ तत्त्वबोध - श्री बाबा उर्फ श्री मंगलनाथ महाराज - मिटमिटा छत्रपती संभाजीनगर*

- **सौ. सुलक्षणा कुलकर्णी,** शिकागो

*लेखाबाबतीत काही प्रश्न असल्यास आम्हाला या पत्त्यावर ई-मेल करा vrutta@bmmonline.org आम्ही आपला संपर्क लेखिकेशी करून देऊ.*

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## ती आणि तिचे गॅरेज

विशाखा माझी शाळेपासूनची मैत्रीण. लहानपणापासून तिची आवड, तिचे खेळ नेहमीच इतरांपेक्षा वेगळे असायचे. तिची विचार करण्याची पद्धत वेगळी. ज्याला कळली ती कळली, नाहीतर बाकीच्यांना फक्त ती काय म्हणते कोण जाणे असेच वाटायचे. माझ्या वडिलांची बदली झाली तर नकळतच शाळेनंतर विशाखाशी तसे अधून मधूनच बोलणे व्हायचे. त्याला पण आता ५ वर्षे होऊन गेली होती.

माझे कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाले होते. कॉलेज कॅम्पसच्या इंटरव्ह्यूमधून नोकरी पण लागली होती. आज अचानक विशाखाची आठवण झाली. तिचे पण कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाले असणार तर आता ती काय करत असेल, तिच्या स्वभावाला अनुसरून ती नक्कीच काहीतरी वेगळे करत असणार हे नक्की होते.

माझ्या वडीलांची बदली परत आमच्याच गावी झाली होती तर जेव्हा आई वडीलांना भेटायला जाईन तेव्हा विशाखाला पण भेटू असे विचार सुरु झाले होते. जूनमध्ये आम्ही सगळी भावंडे म्हणजे माझा धाकटा भाऊ आणि इतर चुलत, मावस भावंडे असे सगळे मिळून माझ्या वडीलांची साठी साजरी करणार होतो.

आम्ही सगळे जण या समारंभाची अगदी वाट पाहत होते कारण आम्ही बाबांना अगदी अनपेक्षित सरप्राईज द्यायचं ठरवत होते. सगळ्यांनीच प्लॅन करून एकदमच घरी जायचे ठरवले. स्टेशनवरच सर्वजण येईपर्यंत थांबायचे ठरले होते. मग Rental van ने सगळे एकदमच घरी गेलो. दार उघडताक्षणी आम्हा सगळयांना एकदम पाहून आई बाबा तर गहीवरलेच. नंतरचा दिवस म्हणजे हशा, गप्पा, खाणे यातच छान गेला. बाबांना आम्ही सारे एकदम त्यांच्याबरोबर असणे म्हणजेच खरा समारंभ वाटत होता. बोलता बोलता मी आईला विचारले, “विशाखा काय करते गं आता?” त्यावर आईने जे सांगितले त्यावर माझा विश्वासच बसेना. विशाखा आता तिच्या वडिलांचे कार गॅरेज चालवत होती. मुख्य म्हणजे स्वतः सगळे कार दुरुस्ती, restoration चे काम पाहत होती. तिच्या कामातील अचूकतेमुळे केवळ या गावातीलच नव्हे, तर आसपासच्या गावांतील लोकही तिच्याकडे येत असत. परत car restoration चे clientele निराळेच होते. मला आता तिला कधी जाऊन भेटते असे झाले होते. तिचा हा प्रवास ऐकायची उत्सुकता होती.

रात्रीच्या समारंभामुळे सगळेच जण दमले होते. मी उठले तर सगळेजण अजून निद्रादेवीच्याच अधिपत्याखाली होते. विशाखाला

फोन करताक्षणी ती इतकी आनंदीत झाली की जणू काही मधले दिवस झालेच नाहीत. काही वेळातच विशाखाच्या घराजवळ पोहोचले. बघते तर काय घराशेजारच्या तिच्या वडीलांच्या गॅरेज मध्ये विशाखा स्वतः हातात tools घेऊन कारच्या बॉनेट मध्ये काहीतरी तपासत होती. माझा आवाज ऐकताच हात पुसतच बाहेर आली. ग्रीस हाताला, कपाळाला लागलेले दिसत होते.

मी हसतच विचारलं, “अगं विशाखा, इथेच काम करतेस ना तू?” त्यावर ती तत्परतेने म्हणाली, “हो, मी इथेच बाबांच्या गॅरेजमध्ये काम करते.” खरंतर विशाखाचा स्वभाव पाहून आश्चर्य करण्यासारखे काहीच नव्हते. विशाखाने तत्परतेने तिच्याकडे काम करणाऱ्याला घरातून चहा आणायला सांगितले आणि मला एक खुर्ची पुढे केली. स्वतः कारच्या टायरांच्या ढिगावर बसत ती म्हणाली, “किती दिवसांनी भेटते आहेस, काय करतेस सध्या” , अश्या अनेक प्रश्नांचा भडीमार सुरू झाला.

मी म्हणाले “माझी काय नेहमीचीच पायवाट आहे. तुझे सांग, तू या व्यवसायात कशी, म्हणजे तसे आश्चर्य करण्यासारखे नाही कारण तुझ्या वडीलांचेच गॅरेज आहे, पण असे floor work, नटबोल्टशी खेळतेस, कसे काय जमते?”. त्यानंतर ती सांगत होती आणि मी फक्त ऐकत होते.

विशाखा म्हणाली, “तसे लहानपणापासूनच मी लुटूपुटीचे काम गॅरेज मध्ये करत होते. सतत बाबांच्या पाठीमागे ते काय करत आहेत, कोणता स्क्रु फिक्स करत आहेत, ते बघत असताना मला नेहमीच उत्सुकता असायची. हे असे कां आहे. प्रत्येक कारचे डिझाईन वेगळे कां आहे. बॉनेट उघडले की ज्या पद्धतीने सगळे दिसते तर ते असे कां? मला एक लहानपणाची गोष्ट आठवते की बाबा बॉनेट उघडून इंजिन ऑईलची लेव्हल पाहत होते. मला ते दिसत नव्हते तर मी एक छोटे स्टूल आणून त्यावर उभारून वाकून बाबा काय करत आहेत ते अगदी कमरेवर हात ठेऊन वाकून पाहत होते. माझ्या भावाने ते पाहून त्याचा फोटोपण काढून ठेवला होता. मग ती उत्सुकता शिकण्याकडे गेली आणि मग हायस्कूल नंतर मी मेकॅनिकलचा डिप्लोमा केला आणि त्यानंतर सरळ गॅरेज मध्ये कामाला लागले. ‘बेबी ऑस्टिन’ ही आमची जुनी कार बऱ्याच दिवसांपासून धूळ खात होती. तिच्यावर प्रयोग करावा, असं ठरवून बाबांची परवानगी घेतली. मग त्या कारचं मेकॅनिक्स समजून घेण्यासाठी मॅन्युअल वाचत राहिले आणि बऱ्याच दुरुस्त्या केल्या. मग कॉस्मेटिक बदल करायचं ठरवलं, आणि पुढे कल्पनांना काहीच मर्यादा राहिली नाही. कारच्या लाईटिंगमध्ये सुधारणा करून मी ऊर्जाबचत करणारे दिवे, फॉग, हेड व टेल लाइट्स बसवले, त्यासोबत स्टायलिश अलॉय व्हील्स आणि पेंट प्रोटेक्शन फिल्म लावून कारला नवा लूक दिला. माझं काम आणि कार रिस्टोरेशन इतकं गाजलं की गावभर त्याची चर्चा झाली आणि लगेचच लोकांची रीघ लागली.

त्याच वेळी गावातल्या एका नामांकित कुटुंबाकडून मला त्यांची अपघातात पूर्णपणे जळून खाक झालेल्या कारचे काही करता येईल का म्हणून विचारणा झाली. त्या कुटुंबासाठी ती कार केवळ वाहन नव्हती, तर त्यांच्या भावनांशी जोडलेली एक अमूल्य आठवण होती. जेव्हा त्यांना कळले की ती अशा अवस्थेतूनही कार पुन्हा नव्यासारखी बनवू शकते, तेव्हा त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवत त्या कार वर काम करण्याची परवानगी दिली. त्या वेळी मात्र माझे सगळे ज्ञान आणि कौशल्य पणाला लागले होते. इंजिन पूर्णपणे खराब झाले होते. आता काय करता येईल हे बघण्यासाठी मी जवळजवळ आठवडाभर दिवस रात्र त्याच विचारात राहून यावरचे उत्तर शोधत होते, शेवटी कार मधले गॅसोलिनच्या संबंधित गोष्टी पूर्णपणे बदलून इलेक्ट्रिक इंजिन बसवले. त्यामुळे तिच कार नव्याने उभी राहिली. या कामानंतर निश्चितच त्या प्रतिष्ठित कुटुंबाच्या नजरेत आमचा मान प्रचंड वाढला आणि हळूहळू या कामामुळे संपूर्ण शहरात आमच्या गॅरेजचे नाव नव्याने लोकांच्या तोंडी झाले. मला स्वत:ला मी त्यांची अपेक्षा पूर्ण करु शकले त्यातच माझे समाधान झाले.

त्या परिस्थितीमुळे प्रयोगाला मोकळे रान मिळाले. जुन्या कार नव्याने झाल्या तर ठीक, नाही झाल्या तरी काही विशेष नव्हते पण यामुळे माझा आत्मविश्वास अधिकच दृढ झाला. माझा सगळा दिवस गॅरेज आणि जुन्या कारवर काम करण्यात जायला लागला. बघता बघता बाबांनी त्यांची Retirement कधी जाहीर केली आणि मी कधी गॅरेजचा ताबा घेतला ते कळलेच नाही. आता माझा भाऊ बाहेरचे सगळे Marketing, Publishing म्हणजे आमच्या car restoration च्या बिझनेसबद्दल बघतो. ते पाहत असताना त्याला एका स्पर्धेची माहिती मिळाली. या स्पर्धेत पंचक्रोशीतील कारप्रेमी भाग घेणार होते आणि कार मेकॅनिक्सचे ज्ञान पणाला लागणार होते. तेव्हाचे दिवस आठवले तरी खूप छान वाटते. स्पर्धेचे सगळे दिवस मी tension मध्ये होते पण बाबा आणि माझ्या भावाच्या प्रोत्साहनामुळे मी ती स्पर्धा जिंकली, म्हणजे स्पर्धेचा निकाल बरोबरीत झाला. पण मी खूश होते, मला माझे असे स्वतःचे कौशल्य दाखवायला मिळाले होते. तसे काम करत करतच मी शिकत गेले. माझ्या उत्सुकतेने त्यात कौशल्य आणले. अजून खूप शिकायचे आहे. आता माझ्या Diploma College मधून मला कधीकधी Guest lecture

साठी बोलावतात. ती पण वेगळी मजा आहे, जिथे शिकलो तिथेच शिकवायला मिळणे म्हणजे माझे भाग्य समजते. तर असे चालले आहे’.

हातातला चहा थंड झाला होता. मी पूर्णपणे दिग्मुढ होऊन विशाखाकडे पाहत होते. Male Dominant कार्यक्षेत्रात तिने स्वतःचे असे स्थान मिळवले होते. तिचे कौतुक करावे तेवढे कमी होते. माझ्या हातातला चहाचा कप बघून विशाखा म्हणाली “आता आत घरात जाऊन गरम गरम चहा करून घेऊ. आईशी पण भेटणे होईल”. मग बोलत बोलत आम्ही आत घरात गेलो.

घरी परत येताना विशाखा आणि तिचं गॅरेज, तिचं आतापर्यंतचं काम हेच विचार डोक्यात फिरत होते. वेगळे काही करून त्यात प्राविण्य मिळवत स्वतःची आवड जपण्याऱ्या विशाखाचा विचार मनात येताच “ती आणि तिचं गॅरेज” हेच चित्र उभं राहिलं.

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा

## जीवनगाणे..!

निरागस बालपणी साथ बालगीतांची,
हसत -खेळत गाताना मौज जगण्यातली;
बालगीताच्या शब्दांमधूनी ओळख सभोवतालची,
स्वच्छंदपणे बागडताना चिंता ना उद्याची...!
उत्साही तारुण्य भावगीतांनी भारावते,
नवीन ध्येयांना नवे क्षितिज खुणावते;
भावभावनांची संपन्नता मनी संस्कार रुजविते,
आयुष्यातील स्वप्ने साकारती प्रयत्नांसंगे...!
मध्यम वयात गाण्यांची आवड निराळी,
भावते मनाला विविधता गाण्यांतली;
कधी शांत अर्थपूर्ण गाण्यांची सरशी,
कधी गाण्यांतील ठेका ठरतो प्रभावी...!
आयुष्याच्या संध्याकाळी सोबत भक्तीगीतांची,
भक्तीगीतांमधूनी ईश्वराला साद प्रेमाची;
ईश्वरभक्तीने मिळते अनुभूती सुखाची,
अन् प्रेरणा जीवनगाणे गात राहाण्याची...!

- **शुभदा जोशी-पारखी**, कोलंबिया, मेरीलँड

## पडत्या दुर्बीणीला स्थिरावताना

गेल्या महिन्यात, रोमन अवकाशदुर्बिणीशी संबंधित एका बैठकीसाठी मी नासाच्या गोडार्ड अवकाश उड्डाण केंद्राला गेलो होतो. तिथे मला एक छोटेसे अवकाशयान पाहण्याची संधी मिळाली. लवकरच ते काहीतरी विलक्षण करण्याचा प्रयत्न करणार आहे: पृथ्वीच्या दिशेने हळूहळू खाली येणारी एक अवकाशदुर्बीण पकडून तिला पुन्हा सुरक्षित कक्षेत स्थिर करण्याचा प्रयत्न.

या अवकाशयानाचे नाव आहे LINK. ते कॅटॅलिस्ट स्पेस टेक्नॉलॉजीज या कंपनीने बनवले आहे. LINK चे वजन केवळ काहीशे किलोग्रॅम आहे. पण त्याचे लक्ष्य त्यापेक्षा खूप मोठे आणि खूप मौल्यवान आहे: नासाची नील गेहरल्स स्विफ्ट (Swift) अवकाशदुर्बीण. २००४ मध्ये प्रक्षेपित केलेली ही १,४७० किलोग्रॅम वजनाची अवकाशदुर्बीण गॅमा-रे बर्स्ट आणि इतर अल्पकाळ टिकणाऱ्या वैश्विक स्फोटांचा अभ्यास करण्यासाठी बनवली गेली होती. स्विफ्टचे आयुष्य आश्चर्यकारक ठरले आहे. मुळात स्विफ्टची मोहीम फक्त दोन वर्षांसाठी आखली होती. पण वीस वर्षांहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही ती खगोलशास्त्रातील सर्वात महत्त्वाच्या, वेगवान प्रतिसाद देणाऱ्या वेधशाळांपैकी एक आहे. स्विफ्टवर तीन उपकरणे आहेत: Burst Alert Telescope (BAT), X-ray Telescope (XRT), आणि Ultraviolet/Optical Telescope (UVOT). एखादा गॅमा-किरण स्फोट किंवा इतर उच्च-ऊर्जेचा अल्पकाळ टिकणारा खगोलीय स्रोत दिसला की स्विफ्टवरील BAT उपकरण काही सेकंदांत त्याचे साधारण स्थान ठरवते. मग स्विफ्ट त्या दिशेने वळून XRT आणि UVOT च्या मदतीने अधिक नेमका पाठपुरावा करते, आणि ही माहिती लगेच पृथ्वीवर पाठवते, जेणेकरून जगभरातील खगोलशास्त्रज्ञही इतर दुर्बिणी त्या दिशेने वळवू शकतील. आधुनिक बदलत्या आकाशाचा वेध घेणाऱ्या खगोलशास्त्राचे लक्ष्यच असे अचानक उद्भवणारे स्रोत असतात. त्यामुळे वेगाने पाठपुरावा करणारी स्विफ्टसारखी दुर्बीण अमूल्य असते.

पण स्विफ्टसमोर एक अडचण आहे. स्वतःची कक्षा बदलण्यासाठी तिच्याकडे स्वतःचे थ्रस्टर्स (वेग/दिशा बदलू शकणारी इंजिने) नाहीत. गेल्या दोन दशकांत पृथ्वीच्या अतिशय विरळ बाह्य वातावरणामुळे तिची कक्षा हळूहळू खाली, पृथ्वीजवळ येत गेली आहे. अलीकडच्या वाढलेल्या सौर उद्रेकांमुळे हे घर्षण अधिक वाढले आहे. सौर उद्रेक पृथ्वीचे बाह्य वातावरण तापवतात आणि त्याचे प्रसरण होते. शेकडो किलोमीटर उंचीवरसुद्धा उपग्रहाचा वेग हळूहळू कमी

करण्याइतपत रेणू तिथे असतात. कक्षा जशी खाली येते, तशी ही प्रक्रिया अधिक वेगाने घडू लागते: कमी उंची म्हणजे अधिक घर्षण, आणि अधिक घर्षण म्हणजे अजून कमी उंची. पृथ्वीपासून सुमारे ६०० किलोमीटर उंचीच्या मूळ कक्षेतून स्विफ्ट आता साधारण ४०० किलोमीटरपर्यंत खाली आली आहे. हे असेच चालू राहिले, तर ती पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा प्रवेश करून जळून नष्ट होण्याचा धोका आहे.

वेळ मिळवण्यासाठी नासाने एक असामान्य आणि वेदनादायी निर्णय घेतला: स्विफ्टच्या निरीक्षणांवर मर्यादा आणल्या, विशिष्ट दिशांना दुर्बीण वळवणे टाळले, आणि एकूणच दिशा अशी ठेवली की वातावरणीय घर्षण कमी होईल. फक्त दिशा बदलल्याने वातावरणातील पुन:प्रवेश केवळ काही महिन्यांनी पुढे ढकलता येतो. म्हणून नासाने आणखी एक धाडसी पाऊल उचलले: विक्रमी वेगाने एक बचावमोहीम उभी केली, स्विफ्टला पुन्हा सुमारे ५५० किलोमीटरच्या सुरक्षित कक्षेत स्थापण्यासाठी.

नासाने ही जलद बचावमोहीम करण्यासाठी कॅटॅलिस्टला ३० दशलक्ष डॉलरचे कंत्राट दिले. नवीन अवकाशदुर्बीण बनवण्याच्या खर्चाशी तुलना केली तर ही रक्कम खूपच कमी आहे. ही मोहीम जलदही आहे: कॅटॅलिस्टच्या मते, समस्या स्पष्ट होण्यापासून ही रोबोटिक युती करण्यापर्यंतचा प्रवास एका वर्षापेक्षा कमी वेळात होत आहे.

आव्हान असे आहे की स्विफ्ट दुरुस्ती किंवा देखभाल ध्यानात घेऊन बनवली नव्हती. अंतराळवीरांनी हबलची पाच वेळा दुरुस्ती केली, पण हबल सुरुवातीपासूनच भविष्यकालीन सुधारणा लक्षात घेऊन बनवली होती. स्विफ्टवर दुसरे यान उतरवण्यासाठी/जोडण्यासाठी सोयीची जागा नाही, “इथे पकडा” असे सांगणारे हँडल नाही, आणि रोबोटिक मेकॅनिकसाठी तयार केलेला कोणताही सोयीचा भाग नाही. त्यामुळे लेखाच्या सुरुवातीला उल्लेख केलेले LINK हे बचाव करणारे यान एखाद्या रुग्णाची शरीररचना प्रत्यक्ष वेळेत समजून घेत जवळ जाणाऱ्या शल्यविशारदासारखे असावे लागणार आहे.

LINK प्रथम स्विफ्टकडे अत्यंत काळजीपूर्वक जाईल आणि सुरक्षित अंतरावरून तिचे अनेक नवे फोटो घेईल. हे फोटो पृथ्वीवर पाठवले जातील. अभियंते ते जुने फोटो आणि मूळ डिझाईनशी तुलना करतील, मशीन-लर्निंग प्रारूपे आणि सिम्युलेशन्स वापरतील, आणि स्विफ्टवरील कोणते भाग पकडण्यासाठी अजूनही पुरेसे सुरक्षित आहेत हे ठरवतील. त्यानंतरच LINK आपल्या यांत्रिक बाहूंनी स्विफ्टला पकडण्याचा प्रयत्न करेल. या मोहिमेत पकडण्याचे अनेक प्रयत्न करण्याची तरतूद आहे, पण प्रत्येक प्रयत्न अतिशय जिकिरीचा असेल, जणू कक्षेत फिरणारी, जुनी, सहकार्य न करणारी, अजूनही गतिमान वस्तू तिला इजा न करता पकडायची आहे.

मानव आणि यंत्र यांची ही भागीदारी या गोष्टीतील सर्वात रोचक भागांपैकी एक आहे. रोबोट अवकाशात असेल, पण निर्णयप्रक्रियेत पृथ्वीवरील माणसांचा सहभाग असेल. अवकाशयान फोटो काढेल, जवळ जाईल आणि हालचाली करेल. पृथ्वीवरील माणसे आणि प्रारूपे त्यातील भौमितीक आकारांचा अर्थ लावायला आणि रणनीती ठरवायला मदत करतील. हा असा अवकाशातील बचावप्रयत्न आहे ज्यात यंत्रमानवशास्त्र, मशीन-लर्निंग, सिम्युलेशन्स, कक्षागतीशास्त्र आणि जुन्या पद्धतीची अभियांत्रिकी सावधगिरी एकत्र येतात. मात्र प्रत्यक्ष पकडण्याच्या क्षणी LINK पृथ्वीवरून सेकंदागणीक नियंत्रित केले जाणार नाही. कमी उंचीच्या कक्षेत असलेले यान पृथ्वीवरील संपर्क केंद्रांना एका वेळी साधारण दहा मिनिटेच दिसते. शिवाय अशा जवळून करायच्या हालचालींसाठी इतक्या झपाट्याने निर्णय घ्यावे लागतात की पृथ्वीवरून माणसाने क्षणोक्षणी नियंत्रण करणे शक्य नसते.

LINK चे प्रक्षेपणयान या गोष्टीचे आणखी एक ऐतिहासिक अंग आहे. ही मोहीम Pegasus XL (पेगॅसस) वापरणार आहे, Northrop Grumman च्या Stargazer नावाच्या L-1011 विमानाखाली वाहून नेले जाणारे हवेतूनच प्रक्षेपित होणारे रॉकेट. नेहमीच्या रॉकेटप्रमाणे जमिनीवरील प्रक्षेपणतळावरून उभे झेपावण्याऐवजी पेगॅसस विमानातून सुमारे ४०,००० फूट उंचीवर सोडले जाते आणि मग त्याचे रॉकेट इंजिन प्रज्वलित होते.

लहान उपग्रह अवकाशात पाठवण्यासाठी ही पद्धत एकेकाळी अत्यंत कल्पक आणि आकर्षक मानली जात असे. आज पुनर्वापरायोग्य रॉकेट्स आणि मोठ्या सामायिक प्रक्षेपण मोहिमांमुळे प्रक्षेपणांचे अर्थकारण बदलले आहे. पण त्या आधी हवेतून केलेल्या प्रक्षेपणामुळे लवचिकता मिळत असे. विमान रॉकेटला योग्य ठिकाणी आणि योग्य उंचीवर घेऊन जाऊ शकत असे, आणि मग पारंपरिक प्रक्षेपणतळाशिवाय लहान उपग्रह कक्षेत पाठवता येत. पेगॅससने १९९० मध्ये पहिले उड्डाण केले आणि आतापर्यंत ४५ मोहिमांमधून साधारण ९५ उपग्रह अवकाशात स्थापन केले आहेत.

यात एक काव्यात्म शक्यताही आहे: स्विफ्ट बचावमोहीम पेगॅससचे हे उड्डाण अंतिम ठरू शकते. अवकाशप्रवेशाच्या एका जुन्या युगातील रॉकेटला शेवटची मोहीम मिळू शकते, नवी वेधशाळा सोडण्यासाठी नव्हे, तर जुनी वेधशाळा वाचवण्यासाठी.

LINK यशस्वी झाले, तर स्विफ्टला अनेक वर्षांचे अतिरिक्त आयुष्य मिळू शकते, कदाचित तिची उपकरणे आणि इतर प्रणाली निरोगी राहिल्या तर दशकभरही. पण या मोहिमेचे खरे महत्त्व

स्विफ्ट पल्याड आहे. अनेक अवकाशयाने वैज्ञानिक प्रयोग किंवा निरीक्षणे संपल्यामुळे निकामी होत नाहीत. त्यांचे इंधन संपते, ते चुकीच्या कक्षेत अडकतात, किंवा हव्या त्या दिशेकडे वळण्याची त्यांची कुवत कमी होते. जलद आणि तुलनेने स्वस्त रोबोटिक दुरुस्ती-सेवा मोहीम उपलब्ध असल्यास उपग्रहांबद्दल आणि पृथ्वीजवळच्या दुरुस्ती-सेवा मोहिमांबद्दल असलेला आपला विचारप्रवाह बदलू शकतो.


विज्ञानासाठी याचा अर्थ असा की मौल्यवान वेधशाळा दुर्लक्षिण्याऐवजी वाचवता येतील. व्यापारासाठी याचा अर्थ महागड्या उपग्रहांचे आयुष्य वाढवणे. उपग्रहांच्या दीर्घायुष्यासाठी तपासणी, दुरुस्ती आणि अखेरीस अवकाश कचरा साफ करण्यात मदत होऊ शकते. आणि धोरणात्मक दृष्टीने, कक्षेतल्या वस्तूंच्या जवळ जाणे, तपासणी करणे, पकडणे आणि हलवणे ही क्षमता अवकाश युगात महत्त्वाची, आणि तितकीच संवेदनशीलही ठरणार आहे.

म्हणून स्विफ्टची ही बचावमोहीम केवळ खगोलशास्त्राची गोष्ट नाही. ती अशा भविष्यातील एक झलक आहे जिथे अवकाशयाने केवळ सोडली जात नाहीत. त्यांची तपासणी होऊ शकते, दुरुस्ती होऊ शकते, इंधन भरले जाऊ शकते, त्यांना नव्या कक्षेत नेता येऊ शकते, आणि त्यांना वाचवता येऊ शकते.

त्या अर्थाने LINK हे दाखवण्याचा प्रयत्न करणार आहे की अवकाशात बचाववाहन, तज्ज्ञ आणि आपत्कालीन प्रतिसाद पथके असू शकतात. आणि ही मोहीम यशस्वी झाली, तर केवळ काहीशे किलोग्रॅम वजनाचे एक छोटे अवकाशयान २१ वर्षांच्या दुर्बीणीला दुसरे आयुष्य देऊ शकते. LINK चे प्रस्तावित प्रक्षेपण जूनच्या अखेरीस आहे.

\- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




*कॅलटेक येथे मे महिन्यात LINK मोहिमेबद्दल व्याख्यान देताना स्विफ्टचे प्रमुख वैज्ञानिक, ब्रॅडली सेंको.*

## वसंतरंग

आकाश मंडपी आज साजरा रंगांचा सोहळा
उधळुनि सारे रंग बोलति, हरि नाम सावळा
बहरुनि गेली सृष्टि सारी, नटली सजली वसुंधरा
संग लाभला आज तयाचा, हर एक क्षण साजिरा
वासंतिक रंग गुलाबी, साद घालिती राधा
रंगांत रंगूनि हलकेचं हासली निरव शी स्तब्धता
पाहुनी किमया सभोवताली, फेर धरूनि पाखरे
तरुवेलींना गूज सांगती, हर्षित अति बावरे
रंगात न्हावूनि दंग राहिली सृजनशील सुमने
अद्वैताची प्रचिती केवळ भिजून हळवी मने

\- **चैत्राली यादव**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## “मराठीपणाचा जागतिक उत्सव : BMM अनुभवताना...”

“अहद तंजावर ते तहद पेशावर” ही ऐतिहासिक घोषणा आणि “अटकेपार झेंडा” ही अभिमानाने उच्चारली जाणारी ओळ मराठी साम्राज्याच्या अथांग विस्ताराची आणि मराठी माणसाच्या पराक्रमाची साक्ष देत आहेत. या इतिहासाचा विचार करताना आज एक नवीन वास्तव अनुभवायला मिळत आहे. आता सातासमुद्रापलीकडेही मराठी माणूस विविध महत्त्वाच्या पदांवर मुख्य भूमिका निभावत उत्कृष्ट कार्य पार पाडत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण, कला, समाजकार्य आणि जागतिक नेतृत्व अशा अनेक क्षेत्रांत मराठी व्यक्तिमत्त्वे आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळ अर्थात BMM सोबत कार्य करताना या जागतिक मराठी सामर्थ्याचा जवळून अनुभव घेत आहे.



२०२३ पासून मला BMM सोबत विविध उपक्रमांतून जोडले जाण्याची संधी मिळत आहे आणि हा अनुभव माझ्यासाठी केवळ कामाचा नसून मराठी अस्मिता नव्याने अनुभवण्याचा प्रवास ठरत आहे. अमेरिकेसारख्या वेगवान, बहुसांस्कृतिक वातावरणात हजारो मैल दूर राहणारे मराठी बांधव आपल्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि नात्यांना इतक्या जिव्हाळ्याने जपत आहे, हे पाहताना मन अभिमानाने भरून येत आहे. जगभरात यशस्वी व्यावसायिक, उद्योजक, शास्त्रज्ञ, कलाकार म्हणून कार्यरत असलेली ही मंडळी एकत्र येऊन “मराठी” या समान धाग्याने बांधली जात आहेत, हीच BMM ची खरी ताकद जाणवत आहे.

BMM सोबतच मला उत्तर अमेरिकेतील विविध मराठी मंडळांशी जोडले जाण्याची संधी मिळत आहे. या सर्व मंडळांतील व्यक्ती अत्यंत प्रेमळ, सहकार्यशील आणि आपुलकीने वागत आहेत. भारत आणि अमेरिकेतील वेळेचे मोठे अंतर असतानाही प्रत्येकजण उत्तम समन्वय साधत कार्य करत आहे, ही गोष्ट खूप प्रेरणादायी वाटते. विशेष म्हणजे, मी ज्या प्रत्येक व्यक्तीच्या संपर्कात येत आहे, त्या प्रत्येकाकडून मला केवळ सहकार्यच नव्हे तर मार्गदर्शनही मिळते. उपक्रमांव्यतिरिक्तही “तू अजून पुढे कसा जाशील” याचा विचार ही मंडळी सातत्याने करतात. त्यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि विश्वास यामुळे माझा आत्मविश्वास अधिक दृढ होत आहे.

विशेषतः BMM मराठी शाळेचा उपक्रम प्रेरणादायी वाटतो. महाराष्ट्रात अनेक पालक आपल्या मुलांनी इंग्रजी माध्यमात शिकावे यासाठी प्रयत्न करत आहेत; परंतु अमेरिकेत वाढणाऱ्या मुलांना मराठी शिकवण्यासाठी आणि मराठी बोलण्याची सवय लागावी म्हणून वेळ देणारे पालक व शिक्षक पाहिले की मन आनंदी होते. घरापासून हजारो किलोमीटर दूर राहूनही “माझ्या मुलाला मराठी यायला हवी” ही भावना जपणारा प्रत्येक मराठी परिवार आपल्या संस्कृतीशी जोडलेला राहत आहे. मराठी भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपल्या विचारांची आणि संस्कारांची ओळख आहे, याची जाणीव BMM सातत्याने करून देते. अलीकडेच मराठी भाषेला मिळालेला “अभिजात भाषेचा” दर्जा हा प्रत्येक मराठी व्यक्तीसाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे. अशा लोकांमुळे मराठी भाषा आणि संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य अधिक सक्षमपणे होत आहे.

या प्रवासात अनेकदा असे क्षण अनुभवायला मिळत आहेत, जे कायम स्मरणात राहतील. BMM मधील अनेक मान्यवर भारतात येत असतात आणि वेळ कोणतीही असो अगदी मध्यरात्र असली तरी आम्ही भेटण्यासाठी प्रयत्न करत असतो. कारण ही नाती केवळ कामापुरती मर्यादित राहत नसून ती आता कुटुंबासारखी जुळत आहेत. प्रत्येक भेटीत मिळणारी आपुलकी आणि स्वागताची भावना मनाला स्पर्श करणारी आहे. या सर्व सुंदर नात्यांसाठी आणि संधींसाठी मी “विद्यार्थी साहाय्यक समितीचे” मनापासून आभार मानतो. तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष, श्री. प्रसाद पानवळकर आणि आमचे मार्गदर्शक, डॉ. प्रसाद प्रधान यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास, दिलेले प्रोत्साहन आणि BMM वृत्तामध्ये माझे विचार मांडण्याची दिलेली संधी यासाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी राहत आहे.

उद्याच्या २ जून रोजी माझा वाढदिवस येत असल्याने, BMM वृत्ताचे हे अंक वाचणाऱ्या सर्व ज्येष्ठ, मान्यवर आणि मराठी बांधवांकडून आशीर्वाद व शुभेच्छा लाभाव्यात, ही नम्र अपेक्षा व्यक्त करत आहे. मराठी माणसांना, विचारांना आणि संस्कृतीला जोडणारा हा जागतिक प्रवास पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरत राहील, अशी मनापासून भावना व्यक्त करत आहे.

जय हिंद, जय महाराष्ट्र!!

**- ओमकार नवनाथ वाघमारे**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका


BMM
वृहन्महाराष्ट्र मंडळ
FILM CLUB
BMM2026
BMM FILM CLUB
मराठी फिल्ममेकर्सचे, हक्काचे व्यासपीठ
SHORT FILM
Competition
TELL YOUR STORY. INSPIRE THE WORLD.
An opportunity for creators to showcase their talent, share powerful stories, and make an impact.
COMPETITION RULES
Short film can be up to 10–15 mins.
It must be made in North America
It was made in last 24 months max.
PRIZES
1ST PRIZE
2ND PRIZE
3RD PRIZE
DEADLINE TO SUBMIT ENTRIES
15th JULY 2026
All winning entries will be shown in
BMM Convention 2026
to a larger audience.
BMM FILM CLUB SHORT FILM COMPETITION
SPECIAL ATTRACTION
MARATHI WEB SERIES PREMIER EVENT
INTERACTION WITH OTHER FILM MAKERS
LEARN TRICKS ABOUT FILM MAKING FROM FELLOW FILM MAKERS
INTERVIEW WITH WEBSERIES MAKERS
AND MUCH MORE...
TO SUBMIT YOUR ENTRIES PLEASE VISIT
https://bmm2026.org/short-film-competition
FOR QUERIES EMAIL:
narendra.kalyankar@bmmonline.org
BE CREATIVE. BE BOLD. BE HEARD.
JOIN THE BMM FILM CLUB SHORT FILM COMPETITION TODAY!


BMM2026
BMM REAL ESTATE CONFERENCE 2026
EMPOWERING GLOBAL BUSINESS LEADERS
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
We're excited to share a few positive updates from this week as momentum continues to build around our upcoming Real Estate Conference:
GROWING INTEREST
Interest in the conference remains strong, with 80 participants having registered their interest so far. Thank you for the encouraging response from the community!
GENEROUS SUPPORT
We are grateful to Mr. Balajee for his generous $10,000 donation received this week. His support significantly strengthens our efforts and vision for the conference.
NEW INDUSTRY ENGAGEMENT
We have initiated discussions with MSR Communities, a Seattle-based builder of Indian origin, to explore potential collaboration and participation opportunities.
EXPANDING COMMUNITY OUTREACH
Outreach efforts are underway to onboard additional realtors from the Marathi community, further strengthening our network and collective journey.
We look forward to sharing more updates as preparations continue. Thank you for your continued support and enthusiasm!
CONTACT:
Santosh Salvi: +1 603 438 9279
Kailas Bhoite: +1 314 397 0989
EMAIL:
santosh.salvi@bmmonline.org
kailasb@bmmseattle2026.org
FRIDAY
7th Aug 2026
START AT
12:00 PM – 5:30 PM
REGISTER / VOLUNTEER



AUGUST 6th, 2026 | SEATTLE, WA
BMM BConnect
AI SUMMIT 2026
AI for All: People | Planet | Progress
Keynote Sessions
Industry Deep Dives
Sustainability Panel
Women in AI Leadership
AI + Cybersecurity Shark Tank
Startup Pitches & Innovation Awards
Hands-On Worksnops
Hands-On Workshops
Generative AI & Agentic AI
Launching
BMM AI INNOVATION NETWORK (BAIN)
Connecting Global Minds
Join us to Shape the Future of AI!
Responsible AI & Governance
Cross-Border Innovation
The Future of Work
https://bmmonline.org/bconnect | Anand.Chouthai@bmmonline.org
732-425-7591


VOLUNTEERS SIGN UP!
for
BMM Bconnect Initiative
& Convention
August 2026
Seattle
https://bmmseattle2026.org/volunteering
BMM VOLUNTEER
VOLUNTEER
Sign Up Today!
Event Support
Registration
Hospitality Team
Join the Team!



दिव्यत्वाची जेथे प्रचिती
BMM Samajrang - US Tour 2026
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
बृहन्महाराष्ट्र मंडळ
समाजरंग
BMM SAMAJRANG
PRESENTS
SOCIAL CHANGE MAKERS OF INDIA
SUMMER 2026 USA TOUR
BMM Samajrang is bringing to you an inspiring opportunity to meet India's renowned social workers who are creating lasting impact in the lives of countless people across the country.
डॉ. विनोद शहा
जनसेवा फाउंडेशन
रस्त्यावरील व झोपडपट्टीतील मुलांचे पुनर्वसन
डॉ. गिरीश कुलकर्णी
स्नेहालय फाउंडेशन
वेश्यांच्या मुलांचे पुनर्वसन
यजुर्वेंद्र महाजन
दीपस्तंभ फाउंडेशन
अपंग, अनाथ युवकांचे पुनर्वसनपुनर्वसन
अशोक देशमाने
स्नेहवन फाउंडेशन
आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे पुनर्वसन
MEET THEM DURING THEIR
SUMMER 2026 USA TOUR
SPECIAL OPPORTUNITY TO INTERACT WITH THEM AT THE
BMM 2026
SEATTLE CONVENTION
Be inspired. Get involved. Make a difference.
CONNECT | COLLABORATE | CREATE IMPACT
To find more information, please visit:
https://bmmonline.org/samajrang/

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
BMM of North America

# BMM WOMEN EMPOWERMENT INITIATIVE 2026

समाजरंग

Women Empowerment

## THANK YOU FOR MAKING A DIFFERENCE!

### Breast Cancer Awareness in Rural Maharashtra

Together, we raised

**$11,660**

to support **ASHA Workers**
(Accredited Social Health Activists)
who are creating awareness about breast cancer among women in underserved rural communities.



### PARTICIPATING MANDALS

| Mandal | Amount |
|---|---|
| Maharashtra Mandal of South Florida | $4,300 |
| Austin Marathi Mandal | $2,300 |
| Philadelphia Marathi Mandal | $1,650 |
| Delaware Valley Marathi Mitra Mandal | $1,625 |
| Triveni Mitra Mandal (Cincinnati) | $1,535 |
| Connecticut Maharashtra Mandal | $250 |
| **TOTAL RAISED:** | **$11,660** |

### What is ASHA?

**ASHA:** Accredited Social Health Activist.

**Role:** A trained female community health worker, selected from the village, who acts as a bridge between the community and the public health system to promote health, increase awareness, and facilitate access to services like immunizations, TB control, and maternity care.

### *Heartfelt Thanks*

We extend our sincere gratitude to all participating Mandal Presidents, committee members, volunteers, and generous donors who supported this BMM initiative.



Your contributions will help ASHA workers educate women in rural Maharashtra about breast cancer awareness, early detection, and preventive care.

Together, through our collective efforts, we are creating healthier communities and empowering women with knowledge that can save lives.

This initiative is carried out in partnership with
Maina Foundation
Empowering Communities. Transforming Lives.

To learn more about Maina Foundation, please visit: www.mainafoundation.org

Let's continue to support, empower and uplift our women.
*Every Woman. Every Life. Every Hope.*

BMM thanks you for being the change!
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
BMM of North America

**BMM WOMEN EMPOWERMENT INITIATIVE • 2026**
*Small contributions. Collective impact. Lasting change.*



AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com




For more details visit: https://bmmonline.org/bvg/


BMM2026
जपूया संस्कृती, विणूया नाती
CALLING STUDENT VOLUNTEERS FOR BMM CONVENTION 2026!
Are you between 12–18 years and excited to be part of something big?
Join us in supporting the BMM Convention 2026 and gain valuable volunteer experience.
Event Dates: August 6 to August 9, 2026
Volunteer Opportunities: Before & During the Event
Get an Official BMM2026 Volunteer Certificate
BECOME VOLUNTEER
REGISTER NOW TO PARTICIPATE
www.BMMSeattle2026.org
/ BMMSeattle2026


बृहन्महाराष्ट्र मंडळ
HURRY!
NEW BATCHES
STARTING SOON!
Learn • Preserve • Celebrate Our Heritage
BMM is pleased to announce new batches for the following traditional learning programs:
पोरोहित्य
(Hindu Priest Training)
ज्योतिषशास्त्र
(Astrology)
कीर्तन
(Devotional Discourse & Kirtan)
LIMITED SEATS AVAILABLE
REGISTER EARLY TO RESERVE YOUR SPOT!
For program details, schedules, and registration information, please visit:
www.bmmonline.org/initiatives
BMM INITIATIVES
Preserving Traditions • Sharing Knowledge • Building the Future


बृहन्महाराष्ट्र मंडळ
HIGH SCHOOL STUDENTS & PARENTS!
DID YOU KNOW?
You can earn up to 4 Language Other Than English (LOTE) Credits toward your High School graduation by demonstrating proficiency in the Marathi language!
avant
Take the
AVANT STAMP
Assessment
(STAndards-based Measurement of Proficiency)
The AVANT STAMP assessment is a nationally recognized language proficiency test that can help students receive academic credit for their Marathi language skills.
आपली भाषा, आपला अभिमान, आपले भविष्य!
EARN UP TO 4 LOTE CREDITS
STRENGTHEN YOUR HIGH SCHOOL TRANSCRIPT
RECEIVE RECOGNITION FOR YOUR MARATHI LANGUAGE PROFICIENCY
TURN YOUR HERITAGE LANGUAGE INTO AN ACADEMIC ADVANTAGE
Whether you learned Marathi at home, through Marathi Shala, or within your community, this is an excellent opportunity to earn credit for a language you already know.
For details about eligibility, testing, and participating school districts, please visit:
www.bmmonline.org/marathishala
मराठी शिका, मराठी जपा, मराठी अभिमान वाढवा! | BMM Marathi Shala Initiative | Preserving Our Language • Empowering Our Youth • Building Our Future

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.




***Shubhamangal***
**Artist: Amita Dalal Rajadhyaksha**
Dimensions: 24"x48"
Medium: Acrylic
Price: $1500
Mandal: MMLA



***Canyon Gorge***
**Artist: Shubhangi Mantri**
Dimensions: 15" x 11"
Medium: Collage and watercolor
Price: $350
Mandal: DFWMM



***Chhatrapati Shivaji Maharaj***
**Artist: Ovee Gawande**
Dimensions:
Medium: pyrography(wood-burning)
Price: Not for sale



***Ashtavinayak Ganapati***
**Artist: Yogini Dahiwadkar**
Dimensions: 36"x36" or custom size
Medium: acrylic/canvas/metal
Price: varies depending on the size and medium



***Storm is coming***
**Artist: Anil Sawe**
Dimensions: 36"x 36"
Medium: oil on canvas
Price: $1,700
Mandal: Bay Area MM



***Nature's Spiral***
**Artist: Kanchan Wagh**
Dimensions: 10"x14"
Medium: Watercolor
Price: $130
Mandal: Fremont

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.